# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १७/१०/२००३

आज दि. १७/१०/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०७ दि. ०९/१०/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. सय्यद मुझ्झफर हुसेन | उपमहापौर |
| ३) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | श्री. परशुराम पाटील | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ७) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ८) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| २२) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २८) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २९) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३३) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | सदस्य |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे | सदस्या |

उर्फ
शिंदे पुजा प्रताप

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३७) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ३८) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३९) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४१) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४२) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ४५) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४६) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४८) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४९) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५०) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५१) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५२) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५५) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५६) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५७) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५८) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५९) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ६०) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |
| ६१) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६२) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६४) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६५) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६६) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६७) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६८) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६९) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७०) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७१) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७२) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७३) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ७४) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ७५) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७६) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

**<u>अनुपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |

**<u>रजेचे अर्ज आलेले सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ३) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा.महापौरः-**

नमस्कार मा. आयुक्त, उपमहापौर, विरोधी पक्ष नेते, सभापती, उपआयुक्त व सर्व उपस्थित सदस्य म.न.पा. अधिकारी व पत्रकार बंधु आपले सर्वांचे स्वागत. दिपावली निमित्त सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, म.न.पा. अधिकारी, कर्मचारी तसेच मिरा भाईंदर शहरवासियांना हार्दिक शुभेच्छा ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. प्र. सचिव साहेब सभेला सुरुवात करावी. प्रत्येक सभासदांनी फक्त पाच मिनिट चर्चा करावी.

**प्र. सचिवः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, या सुचनेस आपणास कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महापालिकेची महासभा दिनांक १७/१०/२००३ रोजी सकाळी ११ वाजता मिरा भाईंदर महापालिका मुख्य कार्यालय तिसरा मजला सभागृह महासभा सुचना क्रमांक ७ दिनांक ९/१०/२००३ रोजीच्या सोबतच्या विषयपत्रिकेच्या प्रकरणांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती. आजच्या सभेकरिता दोन लक्षवेधी सुचना आलेल्या होत्या. त्या महापौरांनी नाकारलेल्या आहेत. आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

(प्र. सचिवांनी प्रश्न क्र. २ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रेः-**

महापौर महोदया, सर्व प्रथम आपण जे आता सुरुवातीला सभा सुरु होण्या अगोदर जे रुलिंग दिले. त्यामध्ये फक्त पाच मिनिटे बंधन हे प्रश्नकर्त्या सन्मा. सदस्याकरिता राखून ठेवलेले आहे. हे सर्वांना सांगावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण त्याचा समज निराळा होतो. सगळयांना वाटेल आम्हाला पाच मिनिटे मिळाली तर त्यामध्ये थोडी सुधारणा करावी. माझ्या प्रश्नाला मी सुरुवात करतो.

महापालिकेने गलिच्छ वस्त्यांमध्ये फोटोपास वाटप करण्याची सुरुवात केलेली आहे. सर्वप्रथम महापौर तसेच प्रशासनाला मी माझ्याव् ातीने धन्यवाद देतो. कारण माझ्या प्रभागामध्ये बहुतेक सर्व ठिकाणी जी सुरुवात होऊन त्याची कारवाई सुरु झालेली आहे. परंतु, प्रशासनावर टिका करायची म्हणून मी बोलतो आहे अशातला भाग नाही. सर्व फोटोपासचे जे धारक आहेत. ते सर्वप्रथम मिरा भाईंदर महानगरपालिकेचे फोटोपासच्या दृष्टीकोनातून नामधारक आणि ग्राहक आहेत, असे मी समजतो. कारण त्यांनी आपल्याला सर्वांना फोटोपास घेते वेळी आपल्या अधिकाऱ्यांकडे त्या फोटोपासची रक्कम अदा करुन त्याची रितसर पावती घेतलेली आहे. परंतु, आपल्या प्रशासनावर माझा असा स्पष्ट आरोप आहे की, सदर फोटोपास देते वेळी पूर्ण फोटोपासचा राज्यशासनाने मान्यताप्राप्त केलेला जो फॉरमेट आहे. संपूर्णपणे आपल्या अधिकात्यांनी तो वाचलेला नाही. तो फुलफिल केलेला नाही. हे सर्व म्हणजे आपले जे फोटोपास आहे. हा अपूर्ण अवस्थेमध्ये लाभधारकाला आपण दिलेला आहे, असा माझा स्पष्ट आरोप आहे. या प्रोसीडिंगमध्ये अशी नोंद करा. काय त्यांनी फुलफिल केलेले नाही. तेही तुम्हाला सांगतो. मतदार यादीचा १/१/९५ चा रेशो पकडून आपण हे फोटोपास दिलेले आहेत. एकाही

फोटोपासवरती त्या मतदार यादीच्या मधील जो फोटोपासधारक आहे. त्याच्या मतदार यादीचा सिरियल क्रमांक किंवा त्या मतदारयादीचा भाग क्रमांक किंवा त्याचे मतदार यादीतील नाव काय आहे? याचा त्या फोटोपासवर कुठेही उल्लेख नाही आणि किती ते कार्ड आपण कस्टमरसाठी पैसे देउन घेतो आहे. मी स्वतः ते बघितलेले आहे. काही फोटोपासवर आपल्या अधिकाऱ्यांच्या सहया नाहीत. काही फोटोपासवर आपल्या महानगरपालिकेचे गोल सिल मारलेले नाहीत आणि लॅमिनेशन करुन टाकलेले आहे. म्हणजे अशी जी फोटोपासची पत्रके आपण वाटलेली आहेत. ते तुम्ही त्या लाभधारकाकडून घेउन सुधारु पण शकत नाही. कारण तुम्ही त्याची लॅमीनेशन करुन डिलिव्हर्ड केलेले आहे. हे होत असताना सन्मा. महापौर मॅडम आपण माझ्या प्रभागामध्ये आलात. आपण एकत्रितरित्या तो फोटोपास वाटपाच्या कार्यक्रमामध्ये दोघेही उपस्थित होतो. परंतु, माझे लक्ष त्या फोटोपासवर होते की, हा फोटोपास कुठल्या टाईपचा बनविला आहे. यामध्ये चुका काय आहेत आणि त्या चुका अजूनपर्यंत सुधारल्या गेलेल्या नाहीत. आताही आपल्या प्रमुख कार्यालयाच्या पहिल्या माळयावरुन फोटोपासचे वितरण होते. परंतु, या फोटोपासमध्ये मी सांगितलेल्या सर्व चुका जशाच्या तशा आहेत आणि अजूनसुध्दा सुधारवल्या गेलेल्या नाहीत. आपण एक लक्षात ठेवा दुकानदाराकडून १५ हजार रुपये घेतो आणि यांच्याकडून साडेतीनशे किंवा सहाशे ज्या पध्दतीने आपण दिलेले आहेत. त्या पध्दतीने रोख पहिल्यांदा रोख कॅश घेतो आणि मग त्याना देत असतो. आपली महापालिका आहे. सर्व नागरिकांची स्वायतत्ता संस्था आपण चालवतो. आपल्यालासुध्दा जसे नागरिकांना पैसे दयायची जबाबदारी आहे. त्यांचे कर्तव्य आहे. तसेच, त्या पैशाच्या अगेन्समध्ये सर्वसामान्य नागरिकांना जे आपण पुरवितो. एखादे कार्ड पुरवितो. एखादे आपण त्यांना डॉक्युमेन्ट देतो. ते पूर्णपणे सक्षम असे आपण देतो का? याच्यावर बघणारा उपआयुक्त कोण? त्यांच्या फोटोपासचा चार्ज कोणाकडे आहे? आणि हया ज्या चुका राहिलेल्या आहेत. म्हणजे एखादे डॉक्युमेन्ट आपण डिलिव्हर करित नाहीत. तिथपर्यंत मी समजेन की, ते अपूर्ण आहे. पण एकदा आपण ते एखादयाला दिले आणि दुसऱ्याने ते घेतले. म्हणजे हे चुकीचे डॉक्युमेन्ट आपण त्याला पूर्णपणे देण्यामध्ये समर्थ झालो असे मी समजतो आहे. याकरिता प्रशासनाने संपूर्णपणे व्यवस्थित खुलासा करावा. काही ठिकाणी ज्या लोकांच्या चार-चार ठिकाणी खोल्या आहेत अशांसुध्दा फोटोपास वाटप झालेला आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे. त्या कार्यक्रमाला दोन व्यक्तींचा मी तुम्हाला फोटोपास दाखविला. त्या व्यक्तीची शहरामध्ये मोठया प्रमाणावर दुकाने आहेत आणि त्यांनी झोपडपटटीमध्ये फोटोपास घेतलेला आहे. मी दोन तुम्हाला त्या दिवशी त्याच कार्यक्रमामध्ये दाखविली अशा काही चुका घडलेल्या आहेत. प्रत्यक्ष जो आर्थिक कमजोर आहे अशा माणसाला जो खरा झोपडपटटीत राहणारा माणूस आहे. त्यालाच हे फोटोपास वाटप झाले पाहिजे. अन्यथा, त्या फोटोपासचा दुरुपयोग या कार्यक्रमामध्ये होईल. आपल्या पुढाऱ्यांचे आपल्या अधिका-यांचे फोटो प्रसिध्द होउन येतील. तो एखादा पुरावा होईल आणि भलतेच काहीतरी होईल याची जरा आपण दक्षता बाळगावी, अशी माझी सुचना आहे. प्रशासनाने याच्यावरती रुलिंग दयावे, अशी मी आपणाला नम्र विनंती करतो.

तसेच, प्रश्न क्र. २ मध्ये मिरा भाईंदर महापालिका परिसरात झोपडपटटी गलिच्छ वस्त्यांमध्ये नळ कनेक्शन देण्या संदर्भात. यामध्ये जे स्थायी समितीमध्ये ठराव झाले. कुठल्याही नियमामध्ये अशी तरतूद नाही की, एखादया राखीव प्रभागाला स्वतंत्र नळ कनेक्शन दयावे. ती तरतूद ज्या परिपत्रकामध्ये आहे. ज्या जी. आर. मध्ये आहे आणि ज्या पुस्तकामध्ये आहे. ही पुस्तके स्वतः आम्ही पुणे येथील यशदामध्ये आम्ही जेव्हा प्रशिक्षणाला गेलो होतो. त्यावेळी तेथील डी.एम.सी. जे होते, श्री. कळमकर त्यांचे नाव होते. त्यांनी आम्हाला त्या पुस्तिका दिल्या. त्या पुस्तिकांमध्ये दलित, आदिवासी यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याच्या सोयी. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार कशा स्वरुपात दयायच्या. त्या लेखी दिलेल्या आहे. त्याच्या प्रती मी सर्व विभागीय त्या त्या वेळच्या अधिकाऱ्यांना मी दिल्या होत्या. परंतु, त्यात कुठलाही विचार न करता या ठरावामध्ये अगदी क्लिअर कट ११ नंबर प्रभाग हा राखीव असल्या कारणाने सगळयांना स्वतंत्रपणे ते नळ कनेक्शन देण्याचे धोरण नगरपालिकेने चुकीच्या पध्दतीने स्थायी समितीमध्ये आम्ही त्याचा विरोध केलेला आहे. मी स्वतः त्याचा सदस्य आहे. ते देण्यास सुरु केले. परिणाम काय झाला. आज तिकडे फलॅटस आहेत. टॉवर्स आहेत. चाळी आहेत. बंगले आहेत. स्वतंत्र घरे आहेत. या सगळयांना तुम्ही स्वतंत्र देणार. जर एकीकडे चाळीमध्ये सरकारी जागेवर अधिकृत चाळी आहेत. झोपडपटटीबद्यल सगळे आकांडतांडव करतात, बोलतात. पण सकाळचा दिवस त्या झोपडपटटीवाल्याकडूनच सुरु होतो. जो राहणारा दूधवाला आहे तो तुमच्या

घरी दूध टाकतो. त्यावेळी तुम्हाला घरामध्ये चहा मिळतो हे लक्षात ठेवा. वर्तमानपत्र तोच माणूस येऊन टाकतो. तेव्हा तुम्हाला वाचायला मिळते आणि आज आपल्या शहरात काय होणार आहे हे वाचायला मिळते. सांगायचा दृष्टिकोन असा आहे की, हे करित असताना तो जो ठराव झाला. त्याच्यामध्ये आज त्याचा दुरुपयोग असा झालेला आहे. हजाराच्या वरती कनेक्शन इललिगल चाळीना लागलेली आहेत. त्याबद्दल सन्मा. सदस्य एकही बोलत नाही, माझे म्हणणे असे आहे.

**लिओ कोलासोः-**

सन्मा.सदस्य मिलन म्हात्रे असे बोलतात ते. इतर सदस्यावर अन्यायकारक आहे असे व्हायला नको.

**मिलन म्हात्रेः-**

अन्याय किंवा न्याय महापौर ठरवतील. माझा प्रश्न आहे. मला अगोदर बोलणे संपवू द्यावे.

**महेन्द्रसिंग चौहाणः-**

दुसरे लोगों का नाम लेने की क्या जरुरत है । हम लोग सक्षम है । हममे विवेक है । आपने जो वर्डिंग किया की अन्य नगरसेवक बोलते नही । हममे अपना विवेक है, अपनी बुध्दि है । ऐसा आक्षेप लगाने का नही ।

**मिलन म्हात्रेः-**

या सभागृहामध्ये मागच्या वेळेला जेव्हा झोपडपटटीला पाण्याचे कनेक्शन हा विषय मी क्लिअर करतो. आमच्या विभागामध्ये आम्हाला स्वतंत्र नळ कनेक्शनची गरज नाही. माझ्या वॉर्डमध्ये जेवढया झोपडपटटया आहेत. तिकडे सगळे ग्रुप कनेक्शन लागून झालेली आहेत. पण महानगरपालिकेने जे धोरण अवलंबायचे आहे. तो कायदयाचा धागा सर्वांना सारखा लागला पाहिजे. माझ्या प्रभागातसुध्दा तो राखीव आहे. राखीव लोकांना स्वतंत्र कनेक्शन देणार का? याचे उत्तर प्रशासनसातर्फे मला पाहिजे. अ, ब, क मध्ये महिला राखीव आहेत आणि ओबीसी महिला आहेत. ज्या घरात ओबीसी महिला राहतात. त्याना स्वतंत्र नळ कनेक्शन तुम्हाला दयायला लागेल. मंजुर आहे का? बोला. ते सुध्दा आरक्षण आहे. मी स्थायी समितीमध्ये पण हेच वक्तव्य केले होते आणि त्यानुसार न्याय दया. जर पाहिजे असेल तर तुम्ही स्वतंत्र नळ कनेक्शन देउ शकत असाल तर दया. माझ्या प्रभागात कनेक्शन लागले आणि लोकाना भरपूर पाणी मिळते. मी समाधानी आहे. मला याच्याबद्यल काही म्हणायचे नाही. पण आता यापुढे तुम्ही जे कनेक्शन दयाल. मिरा गावठणमध्ये जी हजार कनेक्शन लागली आहेत. ती कुठल्या बेसीसवर. याचे आपण रुलिंग दयावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. महापौर महोदया यांच्या अनुमतीने बोलतो. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी जो मुददा उपस्थित केला. त्यामध्ये शासन आदेश आहे. त्यामध्ये १/१/१९९५ रोजी ज्या मतदाराचे नाव मतदारयादीत झोपडपटटीवासियाचे आहे. त्यांना ओळखपत्र देण्याचे शासनाने धोरण निश्चित केले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ओळखपत्र देण्यामध्ये काही किरकोळ स्वरुपाच्या त्रुटी राहिल्यात असे त्यांचे मत आहे आणि त्या त्रुटी राहिल्या असतील तर त्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील आणि अशा त्रुटी यापुढे ओळखपत्रात राहणार नाहीत. याची आम्ही दक्षता घेतो.

**मिलन म्हात्रेः-**

ही जी ओळखपत्र वाटप होत आहेत. त्याबद्दल जरा रुलिंग दया. त्रुटी असलेली ओळखपत्र वाटप करु नये आणि राहिलेली ओळखपत्रे आहेत. ती त्रुटी सुधारुन आम्ही देऊ असे आम्हाला उत्तर पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, आपणच यामध्ये जास्त मोठा सहभाग घेतला होता. झोपडपटटीधारकाना ओळखपत्र मिळावे म्हणून आणि त्याप्रमाणे आपण हा कार्यक्रम लागू केला होता आणि त्यामध्ये या त्रुटी ज्या आहेत. हया त्रुटी प्रशासन आपल्याला आश्वासन देउ इच्छितो की, या त्रुटी लवकरात लवकर दूर करु आणि अशा स्वरुपाच्या त्रुटी आपण लक्षात आणून दिल्याबद्यल धन्यवाद.

**निकम :-**

सन्मा. महापौर मॅडम यांच्या आदेशाने बोलतो आहे. पेणकर पाड्याला जे गावठणमध्ये कनेक्शन दिलेले आहे. १९९४ पूर्वीचे ओळखपत्र हे तपासूनच देण्यात आलेले आहे.

**मिलन म्हात्रेः-**

मी पुरावा घेतला की नाही ते सांगत नाही. जे धोरण तुम्ही लावलेले आहे. प्रत्येक घराघरामध्ये ज्या चाळीना तुम्ही सरकारी जागेवरील चाळीना स्वतंत्ररित्या नळ कनेक्शन दिली. त्याबद्दल मला तुमचा खुलासा हवा आहे. जे तिकडे धोरण अवलंबिले आहे. ते दुसरीकडे का नाही? एकीकडे अन्याय एकीकडे न्याय असे आहे का? ते मला सांगा आणि तुम्ही एकूण किती कनेक्शन दिले? ते मला पाहिजे. पुरावे काय लावले ते फाईली चेक करुन आम्हाला कळेल काय आहे ते. आम्ही पुराव्याबद्यल ऑब्जेक्शन घेतलेले नाही.

**निकम :-**

तो निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आता निर्णय घ्यायचा सांगता त्याच्या अगोदर कारवाई झाली. त्याचे काय? व्हॉट अबाउट दिस ते बोला. ते तुम्ही मला सांगायचे नाही. सभागृहाने घ्यायचे आहे. मी वीस वर्ष राजकारण करत आहे. तुम्ही जी कारवाई केली तर कनेक्शन लागली त्याबद्दल बोला किती कनेक्शन चुकीची आहेत. बरोबर आहेत. जर बरोबर बोललात तर मग तो निर्णय आमच्याकडे लावावा लागेल. जर चुकीचे बोललात तर कनेक्शन कापायला लागतील.

**ज्योत्स्ना हसनाळेः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. आमच्या वॉर्डाविषयी कोणीही आरोप करु नये की, एक हजार कनेक्शन लागलेले आहेत. झोपडपटटीमध्ये माझ्या वॉर्डमध्ये एखादे कनेक्शन लागलेले नाही. स्वतंत्र नळ कनेक्शन फक्त सव्वाशे कनेक्शन मंजुर झालेले आहेत आणि तेवढेच फक्त लागलेले आहे. कुणी कुठलाही आरोप करेल तर आम्ही सहन करणार नाही. राखीव प्रभाग असो किंवा कुठलाही प्रभाग असू दे. आम्ही स्थायी समितीच्या ठरावानुसार केलेले आहे आणि स्थायी समितीच्या ठरावाला फक्त भाजपाचा विरोध होता असे नमुद केलेले आहे. बाकी हयांनी त्यावेळी विरोध केला नाही. आता महासभेमध्ये कोणी करित असेल तर आम्ही ऐकून घेणार नाही. कारण त्यावेळी स्थायी समिती सदस्या मी पण होती आणि हा ठराव झाला होता. त्यावेळी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी विरोध केलेला नाही. फक्त बीजेपीच्या नगरसेवकांनी विरोध केला होता. चार नगरसेवक होते. असा कुठलाही आरोप मॅडम करायचा नाही. या सभागृहामध्ये सन्मा. सदस्य आरोप सहन करुन घेणार नाही.

**मिलन म्हात्रेः-**

त्यावेळी मी जे दलित आहे, आदिवासी आहे. त्यांचा दाखला बघून ती कनेक्शन लावावी अशी माझी सुचना होती. माझी स्वतःची सुचना प्रोसीडींगला नोंद झालेली आहे.

**महेन्द्रसिंग चौहाणः-**

महापौर महोदय, स्टॅंडिंग कमिटी में जब ये मुदद्। आया । सन्मा, सदस्य मिलन म्हात्रेने किसी भी तरह का ऑब्जेक्शन नही लिया । अभी बालते है, उनके झोपडपटटी मे सारे कनेक्शन लग गये । मेरे प्रभाग में दो झोपडपटटी है । अभी एक झोपडपटटी मे भी कनेक्श्न नही लगवाया । मै धन्यवाद दे रहा हुॅ की उनके यहा सारे कनेक्शन लग गया है । दुसरे का विरोध क्यु करते है ।

**मिलन म्हात्रेः-**

आप झुठ बोल रहे है । प्रोसीडींग पढ़ के आ जाओ । आपको एक्स्प्लेनेशन करने की जरुरत नही । हमको प्रशासन की तरफ से जवाब चाहिए ।

**रोहीदास पाटीलः-**

गटनेत्यांच्या बैठकीमध्ये ठरलेले निर्णय पाळायची पहिली जबाबदारी महापौरांची आहे. जे पीठासिन अधिकारी बसतील त्यांनी आपले नक्की ठरले होते की, एका प्रश्नाला दहा मिनिटे द्यायची आहेत आणि जो ज्याचा प्रश्न आहे आणि त्यांच्याशी संबंधित आहे त्यांनीच त्याच्यावर बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

नाही. पाच मिनिटे प्रशासन आणि पाच मिनिटे प्रश्नकर्ता असे होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपला प्रश्न असा होता. मिरा भाईंदर महापालिका परिसरात झोपडपटटी गलिच्छ वस्त्या यामध्ये पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन देण्याचे धोरण नेमके कोणते आहे? किती नळ कनेक्शन आजमितीस देण्यात आले? नसल्यास नळ कनेक्शन लवकरात लवकर

कधीपासून देण्यात येतील असा आपला प्रश्न आहे. त्यावर प्रशासनाने आपल्याला उत्तर दिलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने नवीन नळ कनेक्शन देण्याचे धोरण निश्चित केले असून मा. स्थायी समितीने दि. १८/०१/२००३ च्या ठराव क्र. ९३ अन्वये झोपटपटटी गलिच्छ वस्त्यामध्ये मागणीनुसार ग्रुप कनेक्शन मंजुर करण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, दि.२८/०५/२००३ रोजी ठराव क्र. ५२ अन्वये राखीव प्रभागातील झोपडपटटीधारकांना स्वतंत्र नळ जोडणी देण्याचे धोरण निश्चित झाले आहे. आतापर्यंत शहरातील झोपडपटटीधारकांना १०० ग्रुप कनेक्शन मंजुर करण्यात आलेले असून दि. २८/०५/२००३ चा ठराव क्र. ५२ नुसार एकूण ७० स्वतंत्र झोपडपटटीधारकांना नळ जोडण्या मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रेः-**

या प्रशासनाची परत एक चुक होत आहे. वरती तुम्ही आम्हाला स्पेसीफिक दि. १७/१०/२००३ ची तारीख दिली आहे. उत्तर दिल्याची तारीख आणि खाली तुम्ही दि. २५/५/२००३ आणि १८/१/२००३ हा ठराव झाला समजा. वरती दि. २८/५/२००३ आणि २८/५/२००३ खाली दोन्ही २८/५/२००३ आणि आपण आज दहामध्ये आहोत. पाच महिन्यामध्ये हजारो कनेक्शन लागलेली आहेत साहेब ते याच्यामधून लपवण्यात आलेली आहेत असे का होते? आज तुम्ही दि. १७/१०/०३ उत्तर दिले आणि आजचे काय ते बोलावे. कारण दि.१७/१०/०३ पर्यंत काय केले ते बोलावे. हे अशाप्रकारचे छापील उत्तर जसे रेडिमेड फॉरमेटीक हातामध्ये देत असतात. सगळे करा. वैयक्तिक कनेक्शन कोणाला आहेत व ग्रुप कनेक्शन किती आहेत याचे पारदर्शक असे उत्तर आले पाहिजे आणि हे सर्व अपूर्ण उत्तर आहे. प्रशासनाने अशा प्रकारचे अपूर्ण दिल्याबद्दल आपण कोणाला जबाबदार धरणार आहात. दि.१७/१०/०३ ला आम्हाला पंचवीस तारीख टाकून आम्हाला उत्तर दिले जाते. याच्यावरती जबाबदार कोण? त्याच्यावरती आम्हाला रुलिंग हवे आहे. हे दुस-यांदा झालेले आहे. मागच्या सभेमध्येसुध्दा हेच केले होते. आम्हाला दि. १७/१०/०३ पर्यंतचे सर्व डिटेल्स पाहिजेत. गेल्या मिटींगलासुध्दा हेच होते आणि आतासुध्दा हेच आहे. मी तुम्हाला गेल्या आता कालच्या पावत्या फाडलेल्या दाखवतो. ग्रुप कनेक्शनच्या त्याच्यात कुठेही उल्लेख नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्यांना आतापर्यंत देण्यात आलेल्या कनेक्शनचे स्वतंत्ररित्या पत्र संबंधित विभागाकडून देण्यात येईल आणि त्याचा खुलासा सभेनंतर करण्यात येईल.

**मिलन म्हात्रेः-**

बघा, मला स्वतंत्र नको आहे. हे सन्मानीय सभागृह आहे. या सभागृहामध्ये ओपन झाले पाहिजे व त्याची प्रोसेडिंगला नोंद झाली पाहिजे. मी नगरसेवक आहे मला मान्य आहे. मला वैयक्तिकरित्या तुमची माहिती नको आहे. ही तुम्ही सभागृहाला दिली. सभागृहाची माहिती सभागृहाला दयावी व मिनिटसला नोंद व्हायला हवी. हे पब्लिक डॉक्युमेन्ट आहे. साहेब हे कोणीही माझा मतदार पण मागून घेईल तुमच्याकडून आपण सदन कशाला चालवत आहोत. सभाशास्त्राच्या नियमानुसार याची प्रोसेडिंगला नोंद झाली पाहिजे.

**प्र. सचिवः-**

प्रश्न क्र. ३ सन्मा. सदस्य श्री. रोहिदास शंकर पाटील यांनी विचारलेला आहे. मिरा भाईंदर परिसरामध्ये ना फेरीवाला झोन, नो हॉकर्स झोन जाहिर केले आहेत का? व ते कोणते?

**रोहिदास पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, माझा प्रश्न मला वाटते मी दिलेला डिसेंबर आणि आता ऑक्टोबर महिना चालू आहे. प्रशासनाने उत्तर जे दिलेले आहे. त्याची पुढची मी चर्चा करण्याच्या आधी डिसेंबर ते ऑक्टोबरमध्ये जे काही डेव्हलपमेन्ट झालेले आहे. त्याची कमिटी तुम्ही घोषित केलेली आहे. कमिटीने काय काय याच्यावर कारवाई केली ते पहिल्यांदा नीट खुलासा करावा की, ह्या कमिटीची आजची स्थापना झाल्यानंतर बैठकी आणि बैठकीनंतर कुठपर्यंत आपण पोहचलेलो आहोत. नंतर मग मी पुढची शंका विचारीन.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, मा. पाटील साहेबांनी जो प्रश्न विचारला होता. त्यामध्ये समितीची स्थापना होऊन कमीत कमी चार बैठका आमच्या हया झालेल्या आहेत. त्या बैठकीमध्ये आर.टी.ओ.चे ऑफिसर, तिन्ही पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि ट्रॅफिक पोलिस नंतर एस.टी महामंडळाचे पदाधिकारी, ठाणे

महानगरपालिका परिवहनचे अधिकारी, बेस्टच्या परिवहनाचे अधिकारी यांच्याशी सामुहिक चर्चा केली. त्यांच्या मागण्या काय आहेत हे सुध्दा नमुद करुन घेण्यात आले. पोलिस डिपार्टमेन्टकडून पार्किंग कुठे करावे आणि नो पार्किंग कुठे करावे किंवा फेरीवाल्यांना कुठे बसवावे असा पोलिसवाल्यांकडून अहवाल आलेला आहे. त्यांच्या अहवालाप्रमाणे नगरपालिकेचा डेव्हलपमेन्ट प्लॅन छोटासा करुन त्यावर रंगविण्याचे काम चालू आहे. ते रंगवून झाल्यानंतर महासभेपुढे संपूर्णतः डिटेलमध्ये प्रस्ताव किती हातगाडया, कुठे फेरीवाल्यांना बसवता येईल किंवा कुठे पार्किंग करता येईल व कुठे नो पार्किंग झोन करता येईल याची सविस्तर टिपणी महासभेसमोर आणूनच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

**रोहिदास पाटीलः-**

म्हणजेच आज असे उत्तर आहे का, की पुढच्या महासभेमध्ये ही टिपणी येईल असे उत्तर आहे की अजून ते दहा महिने पूर्ण झाले आहेत. जी शहराची अत्यंत ज्वलंत समस्या आहे. त्या समस्येमुळे महिनाभरसुध्दा थांबायला वेळ नाही. अशावरती दहा महिने झाले तरी अजून त्याची पुर्तता होत नाही आणि कुठपर्यंत पुर्तता होईल अशी आपली अपेक्षा आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

समिती नेमून जवळजवळ चार महिने झालेले आहेत. चार महिन्यात सर्व अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याकडून माहिती घेऊन पुढच्या महासभेमध्ये कोणत्याही परिस्थितीत विषय देऊ.

**रोहिदास पाटीलः-**

हे आपले उत्तर झाले. बरोबर आहे. म्हणजेच प्रोसेडिंगला येईल की पुढच्या महासभेमध्ये हे जे पार्किंग झोन, ज्या ठिकाणी फेरीवाले बसतील किंवा नाही बसतील सायकलवाले, हातगाडीवाले याचे सगळयांचे फायनल होऊन जाईल विचारधीन झाल्यानंतर.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

शंभर टक्के पुढच्या सभेला विषय येईल.

**रोहिदास पाटीलः-**

दुसरा जो प्रश्न आहे. म्हणजे त्याच्यातला आता नक्की झाले की, प्लॅ्न मंजुर होईल आणि लोकांची सोय होऊन जाईल. आता ज्या ज्या ठिकाणी फेरीवाले बसू नये असे आपण मा. स्थायी समितीमध्ये आपण टेंडर देते वेळी दिलेले आहे. तरी त्या ठिकाणी आज फेरीवाले हे बसतात का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

बसलेले आम्ही दररोज उचलण्यासाठी सॅनिटरी इन्स्पेक्टर आणि आरोग्य अधिकारी यांना लावलेले आहेत. दररोज जे तिथे बसणार नाहीत आणि फुटपाथवर जे बसतात. त्याचे मटेरियल आम्ही जप्त करुन आणतो.

**रोहिदास पाटीलः-**

मी तुम्हाला निश्चित सांगतो की, भाईंदर पूर्वेच्या केबिन रोडवर, बी.पी.रोडवर, नवघर रोडवर जो स्टेशन पॅरलल रोड आहे. ह्या ठिकाणी तुम्ही त्याला कोणताही फेरीवाला बसू नये अशी अट दिलेली आहे. या ठिकाणी कधीही फेरीवाला उचलला नाही. एखाद्या वेळी फेरीवाला उचलल्याचे माझ्या लक्षात आहे. एक वेळी ज्यावेळी चव्हाण साहेब माझ्याबरोबर होते आणि फेरीवाल्यांचा स्कॉड आला होता की जेव्हा ते उचलत होते. ते एका बाजूने गेले. दुसऱ्या बाजूने बाजार तसाच चालू झाला. कागदावर जी पुर्तता होण्यापेक्षा त्यांच्या गटाला आपण काही साहित्य दिले नाही का? माणसे दिली नाहीत का? मिरा भाईंदरमध्ये पुरा होईल असा स्कॉड नाही का? हे नक्की निवेदन काय आहे. खानापूर्ती झाली किंवा स्कॉड नेमलेला आहे. फेरीवाले उचलले जातात. पण फेरीवाले जितके आहेत. त्यातील किती एक टक्कादेखील उचलला जात नाही. ही वस्तुस्थिती आहे. याच्यावर प्रशासनाचे मत काय आहे? की तुम्ही त्यामध्ये सक्षम राहिले. अकार्यक्षम राहिले की ते तुम्हाला शक्यच नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अकार्यक्षम कधीच नाही. आपण जर कार्यालयाच्या पाठीमागे जर पाहिले तर जवळजवळ पाच ट्रक मटेरियल पडलेले आहे. दरवेळी आम्ही उचलून आणतो. फेरीवाले आणि दुकानदार कितीही आपण केले तरी ते रस्त्यावर येतातच आणि काही उचलून आणल्यानंतरसुध्दा एका गाडीसाठी चार-चार फोन पण येतात. ही आपल्यालादेखील कल्पना असेलच की, दंड घ्या आणि सोडा. कशाला गरिबांना त्रास देता.

**रोहिदास पाटील:-**

फोन कोणाचे येतात ते तुम्हालाचा माहित असेल. मला काही माहिती नाही. परंतु, ज्या ठिकाणी रोज बसले आहेत. त्याच्यावर तुम्ही बोला की, बी.पी.रोडवर रोज बसले आहेत. त्याच्यावर उचलण्याचे काम आम्ही इतक्या वेळा केले. तुम्ही आता ते सगळे पार्टीचे बोर्ड आणले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

फोन येतात. ते तुम्हाला मान्य नाही.

**रोहिदास पाटील:-**

फोन येतात ते मला मान्य नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे येतच नाही असे म्हणायचे आहे का?

**रोहिदास पाटील:-**

कोणाचे येतात ते तुम्ही सांगा. म्हणून तर मी तुम्हाला विचारले की, तुम्ही सांगा सन्मा. सदस्य यांचे येतात की, सभापतींचे येतात. महापौर, उपमहापौर यांचे येतात असे सांगा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन २००३ पर्यंत जे उचलून आणलेले मटेरियल आणि वस्तू याचा दंड आहे एकोणसाठ हजार तीनशे रुपये आणि २००३-२००४ मध्ये उचलून आणलेल्या वस्तूचा दंड आहे छत्तीस हजार नउशे पन्नास रुपये. रक्कम दंडाची कमी आहे. त्यामुळे उचलून आणलेली संख्या दिसत नाही. दंड वसुल केलेला आहे.

**रोहिदास पाटील:-**

तुम्ही वसुल केले आहेत. महापालिकेच्या उत्पन्नात भर पडली आहे. पण तेवढेच उत्पन्न अपेक्षित आहे का? यांच्यावर जो नेमलेला स्कॉड आहे. एक मुद्दा क्लिअर करा. जो स्कॉड आहे. तो परिपूर्ण आहे की नाही? त्याच्या क्षमतेच्या बाहेरचे काम आहे. त्याबाबत दुमत नाही. ते अकार्यक्षम आहे असे बोलायचे नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मुद्दा दुरुस्त करतो की, नगरपालिकेकडे ऑन ॲथाराईज अतिक्रमणे आणि ऑन ॲथोराईज कन्स्ट्रक्शनने तोडायला दहा-बारा माणसे आहेत आणि जे.सी.पी.ने आपण करतो. परंतु, हे अतिक्रमण उचलण्याचे काम आरोग्य विभागाकडे आहे. त्यांचा स्टाफ आहे आणि त्यांच्या गाडया घेउन दररोज एक फेरी मारायला त्यांना सांगितले आहे.

**रोहिदास पाटील:-**

मग आरोग्याच्याच अधिका-यांना बोलू दया. आता तुमचे तोडफोड काम आहे. हयांचे उचलण्याचे काम आहे. आरोग्याच्या अधिका-यांनी किती उचलले? त्यांच्याकडे माणसे आहेत की नाही? त्यांना सफाईलाच पुरी पडत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एक आठ दिवसापूर्वी याबाबत योग्य कारवाई करण्यासाठी चार स्कॉड केलेले आहेत. वेस्टसाठी स्टाफ वेगळा, ट्रक वेगळा, ईस्टसाठी वेगळा आणि मिरा रोडसाठी वेगळा स्टाफ तयार केला आहे.

**रोहिदास पाटील:-**

याच्यामध्ये ज्यावेळी आम्ही तुम्हाला अर्ज दिलेले आहेत की, याठिकाणचे फेरीवाले हे सुरक्षित ठिकाणी बसवा असे दहा महिन्यापासून किंवा आधीपासून सांगितले. त्याचा कुठेही विचार झालेला नाही. जैसल पार्कच्या नाक्यावर गर्दी होते आहे. जैसल पार्क रेल्वे पॅरलल रस्ता आता तिथे मोकाट आहे. तिथे कोणी बसत नाही. आपण लाखो रुपये खर्च केलेले आहेत. आपण रोज स्ट्रिट लाईट जळत आहेत. त्या ठिकाणी ते फेरीवाले बसवा असे सन्मानाने चार वेळा, पाच वेळा, दहा वेळा पत्र दिले होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठीक आहे. तिकडे जैसल पार्क रस्त्यावर बसवू.

**रोहिदास पाटीलः-**

जेसल पार्क रस्त्यावर नाही. ऑलरेडी ते जैसल पार्क रस्त्यावर बसलेले आहेत. तसे नाही. रेल्वे समांतर रस्त्यावर बसवा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

रेल्वे समांतर रस्त्यावर फेरीवाल्यांना बसवू.

**रतन पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, या संदर्भात या मिरा भाईंदर पूर्व आणि पश्चिम संबंधी हा एकच प्रश्न आहे. फुटपाथवर बसणारे आणि त्याच्यावर सामान ठेवणारे दुकानदार, फेरीवाले यांनी संपूर्ण फुटपाथ आणि रस्ता दोन्ही बाजूने भाईंदर पूर्व आणि पश्चिम येथे अडवून ठेवलेले आहेत. त्या त्या प्रात्यक्षिके कृपया माझ्याकडे आहे. मा. महापौरांना त्या संदर्भातील फोटो दाखवावेत आणि याच्यासंबंधी आम्ही वेळोवेळी पत्रव्यवहार करुन, वेळोवेळी शिष्टमंडळ मागील आठवडयातसुध्दा मा. केळकर साहेबांना भेटलो. यावर संबंधित कारवाई करण्यासाठी त्यांनी आदेशदेखील दिलेला आहे. या बाबतीत आम्हाला लेखी निवेदनसुध्दा देणार होते. आज काही ते आले नाहीत. काय कारवाई होत आहे. या संदर्भात त्यांनी तसे आम्हाला निवेदन पण लेखी स्वरुपात दयावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपले शिष्टमंडळ आले. त्याचे निवेदन आम्ही स्विकारले. आपणाला माहिती असेल की सन्मा. ज्येष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील साहेब यांनी जे मुदद उपस्थित केले. या संबंधित कारवाई अंतिम टप्प्यात सुरु आहे. हॉकर्स झोन तयार करण्याची कारवाई येत्या दहा ते पंधरा दिवसात होईल. कारण की, या संबंधी आतापर्यंत जवळजवळ चार सभा आमच्या संबंधित अधिकाऱ्यांशी पोलिस अधिकारी त्याच्यामध्ये आर.टी.ओ. अधिकारी आणि अनेक विभागाच्या अधिकाऱ्यांना आम्ही त्या सभेमध्ये बोलावले होते. बेस्टचे अधिकारी त्यामध्ये होते. सर्व अधिकाऱ्यांची चर्चा करुन आम्ही ते संपूर्ण जो प्लॅन आहे नो हॉकर्स झोनचा प्लॅन हा पूर्णपणे अंतिम टप्प्यात आहे. तो लवकरात लवकर आम्ही सभागृहात प्रसिध्द करु. सभागृहाची पूर्वपरवानगी घेऊन आणि शक्यतो पुढील सभेत तो प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. धन्यवाद.

**मा. महापौरः-**

सचिव माझे जरा पत्र वाचून दाखवा.

**प्र. सचिवः-**

मा. महापौरांनी त्यांच्याकडचे पत्र मला वाचायला सांगितले आहे. मिरा भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी सभागृह अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सभागृहाचे कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले आहे. पार्टीच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन. यापुढे या सभागृहाचे नवीन सभागृह नेते म्हणून श्री. लिओ कोलासो यापुढे सभागृह नेते म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे, अशी मी घोषणा करतो. आजच्या सभेपुढे दोन रजेचे अर्ज आलेले आहेत. सन्मा. सदस्या लिला गुरुनाथ पाटील, सन्मा. सदस्य सुरेखा यशवंत गायकवाड.

**लिओ कोलासोः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आकस्मितपणे सभागृह नेते पदाची घोषणा करण्यात आली. मा. महापौर मॅडम, मी प्रथमतः आपला मनस्वी आभारी आहे. ही घोषणा होताना मला त्याची काहीही कल्पना नाही. परंतु, आपण ज्या विचारांनी ही घोषणा केली असेल आणि ती आपण केलेली आहे. तर त्यामुळे मला होय बोलण्याखेरीज पर्यायच नाही. परंतु, आपण ज्या विचारांनी ही घोषणा केली आणि मला या ठिकाणी बसण्याची संधी दिली. त्याबददल मी आपले माझ्यावतीने, माझ्या सर्व कार्यकर्त्यांच्यावतीने, माझ्या पक्षाच्या सर्व नेतेगणांच्यावतीने आपले आभार मानतो. मा. गिल्बर्टजी मेन्डोसा हयांची प्रतिकृती म्हणून या सभागृहात आपण नेतृत्व करीत आहात. आपण या सभागृहाच्या पिठासीन अधिकारी आहात. मा. गिल्बर्टजी मेन्डोसा याचे या शहरासाठी योगदान कितीही वादातील असले तरीसुध्दा या शहराचे भले व्हावे अशी त्यांची मार्गदर्शन आणि प्रेरणा आम्हाला मिळालेली आहे. म्हणून आजच्या या प्रसंगी मी त्यांचे जाहिर आभार मानतो आणि त्याचसोबत हया सभागृहात जी ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळी आहे. दुर्देवाने या ठिकाणी सन्मा. उपमहापौर नाहीत. आपले मा. उपमहापौर कुठे गेले ते समजले नाही. स्थायी समितीचे सभापती या ठिकाणी आहेत. विरोधी पक्ष नेते या ठिकाणी आहेत. विरोधी पक्षातील सर्व मंडळी, सहकारी नगरसेवक आहेत. प्रशासनातील अधिकारी,

पदाधिकारी सर्वजण आहेत. मी माझ्या या निवडीबाबत सर्वांचे आभार मानतो आणि त्याचसोबत आपणा सर्वांकडून सभागृहनेतेपदाचे कामकाज चांगल्याप्रकारे चालवण्यासाठी, सभागृहाचे कामकाज जास्तीत जास्त निर्दोष कसे होईल यासाठी आपण सर्वजण मला सहकार्य कराल अशी मी आपणा सर्वांना विनंती करतो. त्याचसोबत सन्मा. सभागृहनेते ध्रुवकिशोर पाटील यांची जेव्हा या सभागृहात सभागृहनेते म्हणून निवड झाली. त्यावेळी त्यांच्या वतीने त्यांचे समर्थन द्यायला मलाच बोलावे लागले होते आणि मी त्यावेळीच बोललेलो होतो कि , आमचा नवखा तरुण आहे. अनुभवी नसला तरी पण त्यांनी या संपूर्ण चौदा महिन्याच्या काळामध्ये या सभागृह नेते पदाचे चांगल्याप्रकारे काम केले आणि आपल्यामुळे कदाचित मला नेतेपदाची संधी मिळाली म्हणून मी आपल्याला विशेष धन्यवाद देतो. आपला मी मनस्वी आभारी आहे. आपण मला सभागृह नेते पदी बसण्याची संधी दिली त्याबददल पुनश्च आभारी. धन्यवाद.

**मोहन पाटीलः-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, या सभागृहामध्ये आज नवनिर्वाचित सभागृहनेते म्हणून लिओ कोलासो यांची आपण नियुक्ती केलेली आहे. त्याबद्दल आपल्याला मी हार्दिक धन्यवाद देतो. आमच्या पक्षाच्या वतीने आाणि आमचे मावळते सभागृह नेते ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रथमच महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर सर्व नवीन आलेल्या सदस्यांना प्रशासनाच्या बाबतीमध्ये त्यांनी तळमळतेने आपले कामकाज चांगल्यारितीने पार पाडलेले आहे. सभागृहामध्ये कोणताही असा वादविवाद निर्माण करुन दिला नाही आणि सर्वांना ॲडजेस्ट करुन सर्वांना एकत्र घेउन सभागृहात असलेले अधिकारी, प्रशासनाचे अधिकारी, सर्व गटाचे नेते, सर्व पक्षाच्या नगरसेवकांना एकत्र घेउन त्यांनी चांगले काम केलेले आहे. त्यांचे सर्वांचे मी आभार व्यक्त करतो आणि लिओ कोलासो यांनी हार्दिक शुभेच्छा देतो की, त्यांचे सभागृह नेते पदी त्यांनी विराजमान झाल्यानंतर या सभागृहाला चांगल्या पध्दतीने कुशल मार्गदर्शन करावे असा आपल्याला सुसंदेश देतो आणि मा. महापौर मॅडमना विनंती करतो की, त्यांनी त्यांचा सत्कार करावा.

**जयंत पाटीलः-**

मा. अध्यक्ष महाशय, आज एक चांगला निर्णय आपण सभागृहात घेतलेला आहे. माझे जवळचे मित्र आणि या सभागृहातील जुने जाणते ज्येष्ठ नगरसेवक यांची नेमणूक आपण सभागृह नेते पदी केलेली आहे. मला खात्री आहे की, आतापर्यंत जे सभागृहात अतिशय शांततेने वातावरण होते आणि आहे. तेच पुढे राहिल. परंतु, कधी कधी आपला राजकीय स्वार्थसुध्दा बाजूला ठेवून चुकीचा घेतलेला निर्णससुध्दा त्यांनी चांगल्या त-हेने हाताळावा आणि ते हाताळतील अशी मला खात्री आहे. कधी कधी काय कॉम्प्लिकेशन्स होतात. सभागृहामध्ये अडचणीचे काहीतरी होते अशावेळी त्यांनी सभागृहनेत्याची भूमिका बजावावी एवढी मी प्रार्थना करतो आणि त्यांना त्यांचा कालावधी चांगल्या तऱ्हेने जावा अशी शुभेच्छा देतो. जयहिन्द.

**धनराज अग्रवालः-**

महापौर मॅडम, अभी आपने मा. कोलासोसाहब को जो सभागृहनेता नियुक्त किया उसके लिये भारतीय जनता पार्टी उनका अभिनंदन करती है । और ध्रुवकिशोर पाटील जो अभी अभी सभागृह नेता पदसे मुक्त हुए है, उनका भी धन्यवाद अदा करते है । और मै सन्मा. सदस्य लिओ कोलासोजी से बिनती करुँगा की, जैसे सभागृह नेता है वो हमारे भी सभागृह नेता हो गये है । तो हमारा भी हर पक्षवालों को ख्याल रखेंगे और कोई भी चीज अपने पक्ष के लिए न करके के सभी के लिए एकसमान होगी ऐसी मैं उनसे अपेक्षा करता हुँ । धन्यवाद ।

**अशोक बळवंत पाटीलः-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे, आजच्या सभागृहामध्ये सभागृहातील ज्येष्ठ अनुभवी नगरसेवक यांना सभागृह नेते पदी सन्मानीत केल्याबददल मा. महापौर मॅडमचेदेखील अभिनंदन करतो आणि सन्मा. सदस्य लिओ कोलासो या सभागृहाची गांभीर्यता लक्षात घेउन आणि त्यांचा अनुभव लक्षात घेउन सभागृह नेते पदी त्यांना दिलेली जी जबाबदारी आहे. ती ते पूर्ण यशस्वीपणे पार पाडतील अशी त्यांना आघाडीच्यावतीने शुभेच्छा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे, आणखी एक अभिनंदनाचा ठराव या सभागृहात मी मांडू इच्छितो. आपल्या मिरा भाईंदर नगरपालिकेमध्ये पाणीपुरवठा खात्यामध्ये काम कलेले अभियंते मा. अजित कापडणीस साहेब यांना ठाणे जिल्हा उत्कृष्ट अभियंता म्हणून पुरस्कार लाभलेला आहे. त्याबददल त्यांचे मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**आसिफ शेखः-**

माझे अनुमोदन आहे.

**ठराव क्र.          :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा खात्यामध्ये काम केलेले अभियंते मा. अजित कापडणीस यांना ठाणे जिल्हा उत्कृष्ठ अभियंता म्हणून पुरस्कार लाभलेला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

**सुचक :- श्री. अशोक बळवंत पाटील.                    अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, गेल्या वर्षभर खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ध्रुवकिशोर पाटील यांनी चांगले सहकार्य केले आणि आज ज्यांची सभागृह नेते पदी म्हणून नियुक्ती झालेली आहे. आमचे ज्येष्ठ नगरसेवक मा. लिओ कोलासो साहेब यांची मा. महापौरांनी सभागृह नेते पदी म्हणून नियुक्ती केली. त्याबददल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. त्यांचा कालावधी यशस्वीपणे जावा, अशी मी आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना करतो. कारण आज सकाळीच मला ते गेटमधून येता-येता प्रथमच आमची दोघांची गाठभेट झाली. हा शुभ शकुनच समजावा असे आहे आणि आज त्यांना नेमके सभागृह पदी नियुक्ती झाली. धन्यवाद.

**धनराज अग्रवालः-**

मा. महापौर मॅडम अभी-अभी सोलापूर में जो पोटनिवडणुक हुई उसमें भारतीय जनता पार्टी के उमेदवार प्रतापसिंग मोहिते-पाटील उनका १,२०,००० मतोंसे विजयी हुए I उसके लिए मैं अभिनंदन का प्रस्ताव मांडता हुँ I

**ठराव क्र.          :-**

सोलापूर येथे झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार श्री. प्रतापसिंग मोहिते-पाटील हे १,२०,००० मतांनी विजयी झाले. त्याबद्दल ही सर्वसाधारण सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. धनराज अग्रवाल.                 अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रेः-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सभागृहातील आणि यापूर्वीच्या नगरपालिकेच्या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक श्री. लिओ इजिदोर कोलासो यांची आज महापौरांनी सभागृहाच्या नेते पदी निवड केलेली आहे. एक वर्ष स्थायी समितीमध्ये मी आणि त्यांनी एकत्रितरित्या काम केले. त्यामुळे त्यांच्या कामाचा मी जवळून अनुभव घेतलेला आहे. त्यांच्या ज्ञानाचा त्यावेळी आम्हाला फायदा झालेला होता. माझ्यापेक्षा वयाने जास्त आहेत. राजकीय अनुभव जास्त आहे. माजी सभापती राहिलेले आहेत आणि अनेक चांगली महत्वाची पदे त्यांनी यापूर्वी घोषविलेली आहेत. या सर्वांचा त्यांच्याकडून या सभागृहाला जरुर फायदा होईल. आपण ही जी निवड केली ते अगदी योग्य निवड आहे असे माझे स्वतःचे मत आहे. त्यांना मी माझ्या पक्षातर्फे जनता दल सेक्युलर पक्षातर्फे आणि माझे सहकारी नगरसेवक यांच्यातर्फे हार्दिक शुभेच्छा देतो. तसेच आमचे सन्मा. मित्र श्री. ध्रुवकिशोर पाटील यांना दिवाळीचा बोनस मिळाला असेही वाटते.

**परशुराम पाटील:-**

मॅडम, आजचा जो आपण निर्णय घेतलेला आहे आणि ध्रुवकिशोर पाटील हे आपले सभागृह नेता होते. त्याचप्रमाणे, वर्ष दीड वर्ष झाले तरी त्यांचे या सभागृहाला चांगले नेतृत्व मिळालेले आहे आणि आज त्यांच्या जागी आपले चांगले अनुभवी म्हणजेच सन्मा. सदस्य लिओ कोलासो बरेचसे दोन-तीन वेळा निवडुन आलेले आहेत. त्यांना सभागृहाचा अनुभव आहे आणि सगळया कार्याचादेखील अनुभव आहे. तरी आपण त्यांची नियुक्ती केलेली आहे. ती योग्य केलेली आहे आणि त्याचप्रमाणे आम्ही सर्व कॉंग्रेस (आय) यांच्यावतीने सन्मा. सदस्य लिओ कोलासे यांचे सभागृहनेता पदी नेमणूक केल्याबददल त्यांचे अभिनंदन करत आहे आणि जसे सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी जसे सभागृह चालवले त्याचप्रमाणे आपणदेखील चांगल्या पध्दतीने सभागृह चालवावे अशी सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांना मी विनंती करतो आणि ते तशा चांगल्या पध्दतीने सभागृह चालवतील अशी मला खात्री आहे आणि मी या ठिकाणी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. आम्ही कॉंग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

**मोहन पाटील:-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी अभिनंदनाचा विरोधी पक्ष नेत्यांनी वर्षाव केला. मनाला चांगले वाटले. परंतु, सभागृहात विरोधी पक्ष नेते म्हणून भूमिका बजावत असताना कॉंग्रेसच्यावतीने अभिनंदन केले. पण सभागृहाच्यावतीने पण करायला पाहिजे असे माझे मत आहे. म्हणून मी आपल्याकडे सुचना मांडली.

**परशुराम पाटील:-**

सभागृहाच्या वतीनेदेखील आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

**रिटा शाह:-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र.२१ माजी सभागृहनेते आणि आता नवीन निवडुन आलेले सभागृहनेते त्यांचे हार्दिक अभिनंदन करते. पण तसेच, माझ्या प्रभागामधून नगरसेवकांना आपण जे सभागृहनेत्याचे पद दिले होते आणि त्यांनी हिंमतीने आणि सफलतापूर्वक त्यांनी पार पाडले. त्याबददल मी सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचा अभिनंदनाचा ठराव मांडते.

**ध्रुवकिशोर पाटील:-**

मा. महापौर मॅडम, गेले अकरा महिने आपण मला सभागृहामध्ये सभागृहनेते पद दिले होते आणि या दिवाळीच्या अगोदर जसे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, एक दिवाळीची आकस्मिक आणि अचानक भेट दिलेली आहे. त्याबददल आपलेसुध्दा धन्यवाद. तसेच, गेले अकरा महिने सभागृहात तसेच सगळया गटनेत्यांनी जे सहकार्य मला केले. त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो.

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य व माजी सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी गेल्या वर्षभरात सभागृह नेत्याचे काम उत्कृष्टपणे केले. त्यांनी सर्व सदस्यांना सहकार्य करुन सभागृह नेत्यांची जबाबदारी सफलतापुर्वक पार पाडली. त्याबद्दल ही सर्वसाधारण सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

तसेच सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांनी स्थायी समितीचे सदस्य म्हणून एक वर्षामध्ये उत्तम प्रकारे काम केले त्यांची आज दि. १७/१०/२००३ रोजी सभागृह नेतेपदी नेमणुक झाल्याने त्यांचेही अभिनंदन ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

**सुचक :- श्रीमती. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४४ चे वाचन केले.)

**रतन पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, महापालिका कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत हा जो आजचा विषय आहे. कालच्या आमच्या गटनेत्यांच्या सभेतसुध्दा हा चर्चेला गेलेला आहे. महापालिकेत काम करित असताना बहुतांशी आम्हाला अधिकारीवर्ग्, कर्मचारीवर्ग यांच्याशी सतत जवळीक साधून यांच्याकडून आम्हाला काम करुन घ्यावे लागत असते. मा. महापौरांना मी विनंती करतो की, आपण या वर्षी त्यांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी म्हणून चाळीस लाख म्हणून जी आपण तरतूद केलेली आहे. ती तरतूद फार कमी आहे. मिरा भाईंदर नगरपालिकेची महानगरपालिका झाली. मागच्या वेळेला आपण त्यांना पहिले वर्ष महापालिकेचे असताना आपण थोडे थोडे त्यांना आपण अनुदान दिले होते. आपल्या बाजूची कल्याण डोंबिवली महानगरपालिका इथेसुध्दा कर्मचा-यांच्यावतीने चांगला सानुग्रह अनुदानाचा ठरावसुध्दा झालेला आहे. मुंबई महानगरपालिका आपल्या वेशीजवळ असलेली महानगरपालिका तेथेसुध्दा सर्व कर्मचाऱ्यांना चांगली दिवाळीची भेट दिलेली आहे. त्याचबरोबर, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनासुध्दा आपण या दिवाळीची चांगली भरघोस अशी भेट दयायची आहे. त्याचबरोबर, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्नातसुध्दा वाढ झालेली आहे. नवीन मालमत्ता कर याबाबत जो सर्वे झालेला आहे. त्याची कर आकारणीसुध्दा झालेली आहे. आपल्याला घरपट्टीमध्ये जास्त रेव्हेन्यु वाढत आहे. तसेच, पाणीपट्टीच्या संदर्भातसुध्दा जास्तीत जास्त वसुली करुन महापालिकेच्या उत्पन्नात जास्तीत जास्त भर करावी. नगररचना यांनासुध्दा मी सांगू शकतो की, आपण आपल्या विभागाकडून डेव्हलपमेन्ट चार्ज ज्या ज्या बिल्डिंगच्याबाबतीत डेव्हलपमेन्ट चार्ज जो बाकी आहे की, लाखामध्ये त्याची गिनती आहे हा सुध्दा डेव्हलपमेन्ट चार्ज लवकरात लवकर वसुल करावा. शंभर टक्के वसुली झाली पाहिजे. माझ्या कर्मचाऱ्यांना ह्या दिवाळीची भेट देण्यासाठी आणि ह्या बाबतीत, शंभर टक्के वसुलीच्या बाबतीत जर कोणी कामचुकारपणा करत असेल तर त्यांच्यावर कडक अशी कारवाई करावी, अशी सुध्दा मी विनंती करतो. माझी सभागृहाला मा. महापौरांना विनंती आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना सानुग्रह अनुदान म्हणून सरसकट पाच हजार रुपये देण्यात यावे अशी मी माझ्या पक्षातर्फे विनंती करतो.

**परशुराम पाटीलः-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपण जे अनुदान कर्मचा-यांना देणार आहात. तर काजुपाडा येथे आपण जे सहा लोक भरलेले आहेत. त्यांना आपल्याला अनुदान देण्यात येणार आहे की नाही, याचे जरा आपण उत्तर देण्यात यावे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य विरोधी पक्ष नेतेच आहेत. आपण जो प्रश्न उपस्थित केला. त्यामध्ये सर्व स्थायी, अस्थायी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येईल.

**मिलन म्हात्रेः-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, महानगरपालिकेच्या या सभेमध्ये प्रकरण क्र. ४४ मध्ये नगरपालिका कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा जो विषय आणलेला आहे. सर्व प्रथम मागच्या सभेत जे ठरले किंवा चर्चेला विषय झाला त्यानुसार यामध्ये माझ्या माहितीनुसार चाळीस लाख एवढी तरतुद आपल्या बजेटमध्ये या लोडला आहे असे असताना आपण वाटेल ती मागणी करुन चालणार नाही. शेवटी बजेटचे जे कंपाउन्ड बायडिंग आहे ते आपल्याला तोडता येणार नाही. कारण सगळी सोंग आणता येतात राजा बनू शकतो, भिकारी बनू शकतो, अधिकारी बनू शकतो, नगरसेवक बनू शकतो पण पाचशे किंवा हजार रुपयांची नोट आपण बनवू शकत नाही. त्याकरिता बजेटच्या प्रोव्हीजननुसार काल जे गटनेत्यांच्या सभेत ठरले. थोडे कटु निर्णय आपल्याला घ्यावे लागतात. त्याला इलाज नसतो. नगरपालिकेच्या ज्या कर्मचाऱ्यांना कालच्या सभेत ठरले. त्यानुसार चार हजाराची रक्कम काल सभेत ठरली होती आणि दोन हजार शिक्षक लोकांना दयायचे आहेत, असेही कालच्या सभेत ठरले. त्यानुसारच याच्यावर निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**मोहन पाटीलः-**

सन्मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रशासनामध्ये असलेले अधिकारी वर्ग, बालवाडयांचे शिक्षक तसेच शिक्षिका आदी कमर्चाऱ्यांना आपण सानुग्रह अनुदान देण्याचा प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे. दिवाळी येत आहे. आनंदाचा सण असतो आणि त्या आनंदाच्या सणामध्ये आमचे कर्मचारी, अधिकारीवर्गही यामध्ये समाविष्ट झाले पाहिजेत, असे आपले मत असते. आदरणीय

महापौर, यापूर्वीही प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट जॉन मेन्डोसा या ठिकाणी असताना त्यांनी अनेक वेळा या सभागृहामध्ये या अधिका-यांना म्हणजे आपले जे अधिकारी आहेत त्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा त्यांनी एक पायंडा लावलेला आहे आणि त्याची परंपरा म्हणून आज त्यांना सानुग्रह अनुदान देण्याचे आपण निश्चित करीत आहोत. बजेटच्या अधीन राहून सर्व कामे आपण केली पाहिजेत आणि आपण सर्व काम करित आहोत. परंतु, राज्यातील बऱ्याचशा नगरपालिका किंवा महानगरपालिकेमध्ये सानुग्रह अनुदान दिलेही जात नाही. प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट जॉन मेन्डोसा यांनी जो पायंडा पाडला, परंपरा जी त्यांनी ठेवली आणि ती परंपरा आपण या ठिकाणी राखलेली आहे. त्याबद्दल महापौर मॅडम, तुम्हाला मी धन्यवाद देतो. सर्व गटनेत्यांच्या सभेत जो निर्णय झाला तो निर्णय आपल्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांनी मान्य केलेला आहे आणि जे गटनेत्यांच्या सभेत ठरल्याप्रमाणे या ठिकाणी तो निर्णय होणारच आहे. मघाशी सभागृह चालत असताना दोन बाबी माझ्या निदर्शनास आल्या. सन्मा. वरिष्ठ सदस्य रोहिदास पाटील, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी गटनेत्यांच्या सभेचा उपयोग या ठिकाणी केला की, गटनेत्यांच्या सभेत अशा तऱ्हेने ठरलेले आहे, अशा पध्दतीने झाले पाहिजे, अशा पध्दतीने बोलले पाहिजे. मनाला अतिशय आनंद झाला आणि चांगली परंपरा या ठिकाणी सभागृहात आणली. त्याबददल गटनेत्यांना मी धन्यवाद देतो. कारण शेवटी सभागृह चालविताना हे गटनेते एक विशिष्ट पध्दतीचे फाउंडेशन आहे आणि विशिष्ट पध्दतीने त्याच्या गाइडलाईन्स मिळत आहेत. त्या गाइडलाईन्स मिळाल्यानंतर या सभागृहामध्ये अधिकाऱ्यांचा वेळ सन्मा. सदस्यांचा वेळ हा वाया जाता कामा नये, अशी भूमिका दोन गटनेत्यांनी आपल्यासमोर मांडली त्याबददल मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना खरोखर धन्यवाद देतो की, गटनेत्यांनी ज्या सभेमध्ये विषय ठरल्याप्रमाणे आपण कोणती चर्चा केली पाहिजे. मला जास्त चर्चा करता येते. मी जास्त बोलू शकतो. मी जास्त संसदपटु आहे, अशा पध्दतीने बरेच सदस्य या ठिकाणी सभागृहात बोलत असतात. बोलण्याची हौस असते. काही सभागृहामध्ये नवीन सदस्य आले. त्यांना बोलावे असे वाटते तर बोलले पाहिजे. परंतु, हे बोलत असताना सभागृहाचा वेळ किती जातो? सभागृहामध्ये कामकाज व्हायला पाहिजे. कामकाजाविषयी किती नेमके बोलले जाते. या सभागृहामध्ये कामकाजाविषयी बोलणारे चांगले संसदपटू आहेत ते बोलत आहेत आणि त्यांनाही काही वेळा बोलता येत नाही अशा पध्दतीने गटनेत्यांना मी विनंती करतो की आपण खरोखरच चांगला पायंडा या ठिकाणी पाडलेला आहे आणि असा पायंडा आपण पाडत रहा की जेणेकरुन या सभागृहामध्ये या विषयपत्रिकेवर माझे सदस्य मी ज्या पक्षाचा गटनेता आहे त्यानेच ठरविले पाहिजे की, मी गटनेता म्हणून माझे सदस्य या सभागृहामध्ये तीन-दोन मिनिटे बोलू शकतील अशा तऱ्हेची चांगली परंपरा आपण आणा. मग ती चांगली परंपरा आपण आणली तर सभागृहामध्ये आपण आज तीन-चार विषय घेतो याच्यापेक्षा भरभक्कम विषय आपण घेऊ शकतो आणि भरभक्कमपणे या शहराचा विकास करु शकतो असे एक माझे मत आहे म्हणून यापुढे ज्या पध्दतीने आपण सुरुवात केली. सन्मा. दोन गटनेत्यांनी या ठिकाणी चांगली सुरुवात केली. त्यांना माझी विनंती राहिल की, आपण आपल्या गटातील म्हणजे आपल्या पक्षातील सदस्यांना आपण अशी गाईडलाईन दिली पाहिजे. ज्या गाईडलाईनखाली त्या लोकांनी पाच-दहा मिनिटे जसे प्रश्नोत्तरांच्या तासाला आपण बोलतो. आपण मॅडम ठरवले की, दहा मिनिटे बोलता आले पाहिजे. तर त्या विषयावर माझ्या पक्षाचे सदस्य हे एवढा वेळ बोलतील अशी वेळ निश्चित करावी आणि अशी निश्चित वेळ केल्यानंतर या सभागृहामध्ये जास्तीत जास्त विषय आपल्यासमोर येतील. जास्तीत जास्त विकासाच्या विषयावर चर्चा करता येईल आणि जास्तीत जास्त विषय आपण घेउ शकतो असे मला या ठिकाणी नमुद करावयाचे आहे आणि गटनेत्यांना मी धन्यवाद देतो की, त्यांनी मघाशी याचा उल्लेख केला की, अशा पध्दतीने गटनेत्यांची सभा झाली आणि या गटनेत्यांमध्ये आपण बोलले पाहिजे ही चांगली प्रथा आम्ही या दोन सदस्यांना वरिष्ठ सदस्य रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांना खरोखरच मी माझ्या वैयक्तिक स्वरुपातसुध्दा आणि आमच्या पक्षातर्फेसुध्दा तुम्हाला धन्यवाद देतो की, आपण हा चांगला पायंडा आपण चांगल्या पध्दतीने गटनेत्यांची सभा घेऊन चांगल्या सदस्यांना एकत्र घेऊन आपला पायंडा पाडा म्हणजे आपल्या अखत्यारीत असलेल्या वेळेमध्ये आपण सभा पार पाडू शकतो आणि आपल्या या पार पाडण्याच्या वेळेमध्ये शहराचा चांगला विकास करु शकतो अशा पध्दतीचे मत मी या ठिकाणी व्यक्त करतो आणि आपल्या बजेटच्या अधीन राहून आपण मला बोलता येते म्हणून मी सांगेन हे अधिकारी माझे आवडते आहेत. म्हणून माझ्या पक्षाचा प्रभाव पडला पाहिजे. म्हणून त्यांना वीस हजार आणि पंचवीस हजार अनुदान दया, अशा पध्दतीचे भाष्य केले

पाहिजे. या तुमच्या मुद्दाशी मी सहमत आहे. परंतु, आपल्याकडे हे बजेट आहे. आपल्याकडे एक आकडेवारी आहे. त्या आकडेवारीत बसून आपल्याला दयायचे आहे आणि जो चांगला पायंडा पाडला. त्याप्रमाणे येथील अध्यक्षांनी चांगल्या त-हेने सुरुवात केलेली आहे. चांगली प्रथा या ठिकाणी पाडलेली आहे. अधिकाऱ्यांना ज्या पध्दतीने आपण धारेवर धरतो आणि धारेवर धरल्यानंतर त्यांच्याकडून आपण काम करुन घेतो. एक दिवस आपल्याला चांगला मिळतो की, त्या दिवसामध्ये आपण अधिकाऱ्यांना आपल्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रामध्ये असलेल्या शाळांचे शिक्षक, बालवाडया यांनाही चांगले अनुदान आपण दयावे. सभागृह याचा विचार करतील आणि चांगले अनुदान देतील, अशी मी इच्छा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द मी या ठिकाणी संपवतो. धन्यवाद.

**आसिफ शेख:-**

प्रकरण क्र. ४४ महानगरपालिका कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत. दिवाळीच्या शुभप्रसंगी सर्वांचेच तोंड गोड करायला पाहिजे. आपले महापालिकेचे जे कर्मचारी आहेत. वर्ग-३ चे वर्ग-४चे त्याप्रमाणे आपले महापालिकेच्या ज्या शाळा आहेत. त्या शाळेतील जे शिक्षक आहेत हे सर्व कर्मचारी म्हणजेच शिक्षक कर्मचारी असो, महानगरपालिकेतील कमर्चारी असो, सतत आपल्या महापालिकेचा सर्वांगीण विकास करण्यामागे त्यांचाही सक्रिय सहभाग असतो. त्यांचाही मोलाचा सहभाग असतो. शेवटी आपण प्रत्येकवेळी शहराचा विकास करीत असताना सर्व पक्षातील लोक, सर्व नागरिक ज्याप्रमाणे आपण अधिका-यांकडून, कर्मचा-यांकडून त्वरीत कामाची अपेक्षा करतो. तसेच, शिक्षकांकडून उत्तम शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. शहरातील सर्वांगीण विकास तत्परतेने झाला पाहिजे. तरी अधिकारी अहोरात्र मेहनत करीत असतात तर त्यांना या दिवाळीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याची एक पोचपावती त्यांनी याच्यापुढेसुध्दा चांगले काम करावे आणि आणखी शहराचा सर्वांगीण विकास कार्यरतेने भर घालावी. शिक्षकांना आतापर्यंत म्हणजे जेव्हा आपले सर्वांचे लाडके आदरणीय नेते मिरा भाईंदर शहराचे कार्यसम्राट प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेन्डोसा साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत सर्वप्रथम शिक्षकांना सानुग्रह दिले होते. त्यांच्यानंतर काही शिक्षकांना देण्यात आले नाही. परंतु, गिल्बर्ट मेन्डोसा साहेबांची भूमिका या ठिकाणी सांगितले की, पहिल्यापासून की हयात लेके चलो कायनात लेके चलो, चलो तो सारे जमानेको साथ लेके चलो. सर्व जात, पात धर्म संप्रदाय सर्वांनीच मग कुणावर अन्याय होता कामा नये. कर्मचाऱ्यांमध्येसुध्दा शिक्षकसुध्दा आपलेच कर्मचारी आहेत ही भूमिका आपण नेहमी जोपासलेली आहे आणि सर्वांनाच बरोबरीने घेऊन लोकांना समान न्याय देण्याचा आमचा नेहमी प्रामाणिक प्रयत्न असतो आणि त्या दृष्टिकोनातून या ठिकाणी मी एक ठराव मांडू इच्छितो की, या आर्थिक वर्षात आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सरसकट वर्ग-३ असो किंवा वर्ग-४ असो या कर्मचाऱ्यांना एकूण ११११० कर्मचारी आहेत. सरसकट या कमर्चाऱ्यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान म्हणून साडेतीन हजार रुपये त्याचप्रमाणे आपले बालवाडी शिक्षक आहेत. त्या शिक्षकांना सानुग्रह अनुदानापोटी पाचशे रुपये आणि जे आपले शिक्षक वर्ग आहे. प्राथमिक शाळेतील जे शिक्षक आहेत. त्या शिक्षकांना सरसकट दोन हजार रुपये अनुदान देण्यास ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे आणि हे सानुग्रह देत असताना आपल्या अर्थसंकल्पात जी तरतुद आहे. ती एकुण चाळीस लाख रुपयाची तरतूद आहे आणि शिक्षकांना सानुग्रह अनुदान दिल्यामुळे बजेटमध्ये थोडाफार बदल होणार आहे. तरी अप्रोप्रिएशन करावे लागणार आहे. त्यासाठी बजेटचे पुर्ननियोजन करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, झालेल्या ठरावाला अनुमोदन झालेले आहे. परंतु, मला असे वाटते की, थोडीसी दुरुस्ती केली तर बरे होईल. कारण आपण सर्वांच्या अनुदानामध्ये पाचशे रुपयांनी वाढ केलेली आहे. परंतु, बालवाडी कर्मचाऱ्यांना सुरुवातीपासूनच जे सानुग्रह अनुदान आहे. ते पाचशे रुपयापर्यंत थांबलेले आहे. त्यांना पाच पैशाचीसुध्दा वाढ केलेली नाही. आज पाचशे रुपयात त्याचे काहीही होणार नाही.

**मा. महापौर :-**

त्यांचा जेवढा काही पगार आहे. तेवढेच त्यांना दिले आहे.

**प्रभात पाटील:-**

तेवढाच आहे. परंतु, सानुग्रह अनुदानामध्ये मा. प्रथम नगराध्यक्ष असल्यापासून कधीही वाढ झालेली नाही. तरी निदान या आपल्या या कारकिर्दीत आपण एक महिला महापौर आहात आणि या सगळया बालवाडी शिक्षिका हया महिला आहेत. तरी त्यांना थोडीशी वाढ देण्यात यावी, असे मला वाटते आणि सभागृहाचीसुध्दा तशी इच्छा असावी. सभागृहाने एक हजार रुपये करण्यात यावे असा ठराव मांडावा.

**मा. महापौर:-**

पुढच्या वेळी देऊ या आपण.

**प्रभात पाटील:-**

मा. महापौर मॅडम, आपण आहात व पुढेसुध्दा आपण राहणार आहात. त्याबददल वाद नाही. परंतु, पुढच्या वर्षाची वाट कशाला बघायची? आताच तोंड गोड केले तर काय बिघडेल, अशी माझी इच्छा आहे. सभागृहानेसुध्दा मला असे वाटते की मान्यता दयावी.

**दिनेश नलावडे:-**

या ठिकाणी सौ. प्रभातताई पाटील यांनी बालवाडी ज्या शिक्षिका आहेत. त्यांच्यासाठी ज्या ठरावाबाबत या ठिकाणी विनंती केली आहे. प्रभातताईंनी तर ती विनंती खरोखरच आपण सर्व सभागृहाने करण्यास योग्य आहे. त्या बालवाडयाच्या ज्या शिक्षिका आहेत. खरोखरच त्यांची मेहनत चांगली आहे आणि कामही चांगले आहे आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आज जे सभागृहाने पाचशे रुपयाचे अनुदान घोषित केलेले आहे. तरी आता आमच्या ताईंनी जो प्रस्ताव मांडलेला आहे की, एक हजार रुपये त्यांना देण्यात यावे. मी या ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या वतीने बालवाडयाच्या ज्या शिक्षिका आहेत. त्यांना एक हजार रुपये अनुदान म्हणून घोषित करुन या सभागृहाने विनंतीस मान दयावा, अशी मी या सभागृहास विनंती करतो.

**मुक्ता रांजणकर:-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील आणि सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे यांनी जी मागणी केलेली आहे त्यास माझे अनुमोदन आहे आणि तसे करण्यात यावे.

**शशिकांत भोईर:-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, आपण जो आता सानुग्रह अनुदानाचा जो ठराव आणला. त्याबददल सर्वांचे धन्यवाद. मी आभारी आहे. पण याच्यात थोडी उपसुचना मांडतो. मी मनपा केलेल्या आर्थिक तरतुदीस अधीन राहून सर्व कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान लेखा परीक्षण किंवा शासनाने काही त्याच्यात त्रुटी काढल्या तर ते वसुलीस पात्र राहतील, अशी अट त्याच्यात घालावी, अशी उपसुचना मी मांडतो.

**प्रकरण क्र. ४४ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी, कामगार संघटनानी व मा. विरोधी पक्ष नेते मिरा भाईंदर यांनी कर्मचा-यांना दिवाळी पूर्वी बोनस व सानुग्रह अनुदान देण्याबाबत विनंती केली आहे. परंतु मागील तिन वर्षापासुन शासनाने कर्मचा-यांना बोनस देण्यांचे बंद केले असुन महानगरपालिका कर्मचारी बोनस ॲक्ट नुसार बोनस मिळवण्यास पात्र नाहीत. त्यामुळे महानगरपालिका कर्मचा-यांना बोनस शासनाचे निर्णयाशिवाय देता येत नाही. मात्र मागील वर्षी मा.मुख्यमंत्री सो., महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक महाराष्ट्र राज्य महानगरपालिका कर्मचारी संघटना व इतर यांच्या समवेत दि.३१/१०/०२ रोजी मागण्या बाबत झालेल्या बैठकीतील कार्यवृतामध्ये नमुद केल्यानुसार ज्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती उत्तम असेल त्या महानगरपालिकेने महानगरपालिका स्तरावर आर्थिक परिस्थिती नुसार सानुग्रह अनुदान किती दयावे या बाबत निर्णय घेण्यांत यावा. मात्र महानगरपालिका कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान दिल्यास राज्य शासन त्यावर कोणतेही अनुदान देत नसल्यामुळे सानुग्रह अनुदान देण्या बाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाची पूर्व

परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. मात्र सदर खर्च महानगरपालिका फंडातुन करावयाचा असून. सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेस महापालिका सक्षम आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००२-०३ चे महसुली उत्पन्न ६६.४४ कोटी आहे व हे उत्पन्न मागील वर्षाचे तुलनेत जास्त आहे. व आस्थापनेवरील होणारा खर्च १३.४० टक्के इतका अल्प असुन कर्मचारी वर्ग सुध्दा अत्यंत कमी असल्याने कर्मचा-यांना जादा वेळ थांबुन सुट्टीचे दिवशी येवुन कामे करावी लागतात. त्या मोबदल्यात त्यांना अतिरिक्त भत्ता देण्यांत येत नाही. त्यामुळे कर्मचा-यांचे अतिरिक्त कामाचे मोल अथवा अन्य काही जादा मेहनताना म्हणून सानुग्रह अनुदान देण्याबाबत केलेल्या कर्मचारी व कामगार संघटनाचे विनंती नुसार कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान प्रत्येकी वर्ग-३ व वर्ग ४ करीतां रु. ३,५००/- , रोजंदारी कर्मचारी यांना प्रत्येकी रु.१,५००/- व बालवाडी शिक्षीका रु. ५००/- याप्रमाणे दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदान मंजुर करण्यांत येत आहे.

मागील वर्षी सानुग्रह अनुदान बाबत कर्मचारी संघटना व मा.मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दि.३१/१०/०२ रोजी बैठक झाली होती.त्याचे इतिवृत्त मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, दि.२७/११/०२ ने प्राप्त झाले आहे. त्यानुसार सानुग्रह अनुदानाचा खर्च हा महानगरपालिका फंडातुन होणार असल्याने शासनाचे मंजुरीची आवश्यकता नाही. मात्र अंदाजपत्रकीय तरतुदीपैक्षा जादा होणारा खर्च पुनर्विनियोजनद्वारे भागविण्यांत यावा. त्यानुसार महानगरपालिका कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ४४ (अ) :-**

महानगरपालिका शिक्षक कर्मचा-यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणे बाबत.

**ठराव क्र. :-**

महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील कार्यरत शिक्षक यांना महापालिका ५० टक्के अनुदान भत्त्यासाठी देत असल्यामुळे त्यांच्या शिक्षक संघटनेने महापालिका कर्मचा-याप्रमाणे सानुग्रह अनुदान शिक्षकांना देणे बाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन रु. २०००/- इतके सानुग्रह अनुदान शिक्षकांना देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. मात्र शिक्षकांना अनुदान देण्याबाबत लेखा आक्षेप अथवा शासनाने आक्षेप घेतल्यास आनुदान वाटपा पूर्वी त्यांच्याकडून वसुली बाबत लेखी हमी पत्र लिहून घेणे या अटीवर ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे:-**

मा. महापौर याबाबत बोलण्यास आपली परवानगी मला हवी आहे. प्रकरण क्र. ४५ हा अतिशय महत्वाचा विषय आहे. प्रशासनाने परत एकदा प्रशासकीय चुक करुन आपल्या सभागृहासमोर विषय आणलेला आहे. हा एक उत्तम नमुना आहे. कारण या सभागृहाच्या निर्णयाद्वारे नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहोत. या प्रकरणामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६(ब) हे आपण सदनासमोर आणलेले आहे. परंतु, याच कलमातील ५६(अ) आपण सांगत नाही. याच्यामध्ये भत्ते वगळून ज्याचे मासिक वेतन १००० रुपयाहून अधिक आहे,

अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यांस स्थायी समितीची पूर्वसंमती वाचून मा. आयुक्तांतर्फे बडतर्फ केले जाणार नाही. स्थायी समितीपुढे हा विषय मंजुरीसाठी आला होता का? आणि जर स्थायी समितीपुढे हा विषय आला नव्हता तर या सभागृहामध्ये हा जाणूनबुजून विषय आणायची हिंमत केली कोणी? सहया देऊन धडधडीत सरळ आयुक्तसुध्दा आमचे हे पाठवून देतात. हा काय प्रकार चाललेला आहे? हे काही मला कळत नाही. बघा, निलंबित करा, नका करु, करावे का? तो भाग नंतरचा आहे. परत यामध्ये एका कर्मचाऱ्याचे नांव घेतलेले आहे भरत सोनारे. माझ्याकडे काही पेपर्स आहेत. म्हणजेच जो काही पोलिसांचा तपास झाला त्याचे पेपर्स आहेत. त्याच्यामध्ये सहा हजार रक्कम ही दोघांनी एकत्रितरित्या स्विकारलेली आहे आणि त्याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडले गेले आहे, अशी शब्दरचना या पेपरमध्ये आहे, असे असताना मिरा भाईंदर महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी या नात्याने दोन व्यक्ती अधिकारी आणि क्लार्क या दोन व्यक्ती त्या शाळेमध्ये गेल्या होत्या. त्यांचे कामकाज झाल्यानंतर ती रक्कम त्यांनी घेतलेली आहे असा पोलिस अहवाल कोर्टाला सादर केल्याचे तो म्हणतो आहे, असे असताना फक्त एकमेव त्या सोनारेवर आपण चार्जशीट फाईल करण्याकरिता मंजुरी मागत आहात. आपले जे सूर्यवंशी ते आपले कर्मचारी होते नव्हते आम्हाला माहित नाही. पण ते आपल्या प्रतिनियुक्तीवर होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव घेऊन ते त्या ठिकाणी गेले होते, असे असताना त्या व्यक्तीचा या ठरावात कुठेही उल्लेख नाही. सदर ठराव उदया जर उच्च न्यायालयामध्ये याच्यावर रिपीटेशन झाले तर दोन मिनिट टिकणार नाही. सर्व सन्मा. सदस्यांना सांगतो, गंभीर होऊन यावर विचार करा. एका व्यक्तीवर आपण अन्याय करतो आहे आणि दुस-या व्यक्तीवर आपण त्याला सोडून देतो आहे. गुन्हा दोघांनीच सारखा केलेला आहे. पैसे दोघांनी घेतले. हाताना रंग दोघांना लागलेला आहे, अशा परिस्थितीमध्ये सर्व सभासदांची तुम्ही मिसगाईड करुन आमच्याकडून एक चुकीचा निर्णय मागून घेता. याला पायंडा पडला पाहिजे. ५६ नुसार स्थायी समितीची तुम्ही मंजुरी घ्या. येत्या मिटींगमध्ये तो विषय घ्या आणि मग हा विषय आणावा अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. या महत्वाच्या विषयावर मा. महापौर मॅडमने रुलिंग दयावे.

**लिओ कोलासोः-**

मा. महापौर साहेबा, सभागृहाच्या कामकाज पध्दतीप्रमाणे जेव्हा एखादया विषयावर ठराव प्रपोज होतो. त्यावर सर्व स्तरातील नगरसेवक मंडळी आपल्या परवानगीने आपले विचार मांडतात. त्यामुळे एखादया नगरसेवकाने विचार मांडल्यावर लगेच रुलिंग देणे बरोबर होणार नाही. म्हणून सर्व नगरसेवकांचे ऐकून झाल्यावर यावर आपल्याला रुलिंग दयावे लागेल, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मिलन म्हात्रेः-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासोसाहेब आपल्याला माहिती असेल की, लगेच ठराव पास पण होतात. अनुमोदन होते. ठराव पास होतात. सुचक होतात, म्हणून मी बोलत आहे. म्हणजे रुलिंगची कोणीही वाट बघत नाही.

**लिओ कोलासोः-**

मी सभागृहाच्या निदर्शनास जी वस्तुस्थिती आहे. ती सांगण्याचा प्रयत्न करतो की, प्रशासनाने भरत सोनारे यांच्या संदर्भातील एकाकीच टिप आपल्या गोषवा-यामध्ये पाठविलेली आहे. आपला त्यालाच आक्षेप आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, सूर्यवंशीसाहेब हे आपले कर्मचारी नाहीत आणि त्याबददलचे सभागृह कशाप्रकारे ठराव करु शकेल हा आम्हालादेखील चिंतेचा विषय आहे. त्याबददल सत्ताधारी पक्ष योग्य स्वरुपामध्ये कदाचित आपल्याशी सहमत होईल अशा स्वरुपाची विचारधारा व्यक्त करेल आणि तशा स्वरुपाचा ठराव करायची वेळ आली तर करण्यात येईल.

**आसिफ शेखः-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ४५ निलंबित लिपिक श्री. भरत सोनारे यांचे निलंबन कायम करण्याबाबत हा विषय जो आलेला आहे. मला वाटते अत्यंत घाईगर्दीने महासभेपुढे आलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये सन्मा. सदस्य यांनी या ठिकाणी जो उल्लेख केलेला आहे. तो बरोबर आहे. खरे म्हणजे भरत सोनारे यांचे निलंबन म्हणजे कर्मचा-यांना यांच्यावर शास्ती जर लादायची असेल तर संपूर्ण अधिकार स्थायी समितीचे आहेत आणि मी वारंवार बोलत आलेलो आहे की, जे स्थायी समितीचे अधिकार स्थायी समितीने वापरले पाहिजेत आणि

जे महासभेचे अधिकार महासभेनेच वापरले पाहिजेत. स्थायी समितीला बायपास करुन हा जो विषय महासभेत आलेला आहे. तो अत्यंत चुकीच्या पध्दतीने आलेला आहे आणि भरत सोनारे जे आहेत. त्यांचे निलंबन कायम करण्यास स्थायी समितीची मंजुरी घ्यावी आणि त्यानंतर हा विषय महासभेपुढे आणावा आणि जे आपले सूर्यवंशी साहेब होते, शिक्षण प्रशासन अधिकारी मला वाटते ते आपले कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची शास्ती लादण्याचा आपल्याला अधिकार नाही. ते शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग हे त्यांच्या संदर्भात उचित कारवाई करतील. तर या भरत सोनारे संदर्भात जे निलंबन आहे, हा विषय स्थायी समितीपुढे घेण्यात यावा, असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

मा. महापौर मॅडम, हा जो विषय आलेला आहे. ज्या दिवशी मिरा रोडमध्ये ही घटना घडली. ॲन्टी करप्शनने आपल्या दोन अधिका-यांना पकडले. तेव्हा वर्तमानपत्राच्या आधारावर मी या सभागृहात त्यावेळी उपस्थित आयुक्त आर.डी. शिंदे यांना प्रश्न विचारला होता की, वर्तमानपत्रात अशी अशी बातमी आलेली आहे. त्याबददल आपल्याला काही माहिती असल्यास सभागृहाला दयावी. ती सभा माझ्या माहितीप्रमाणे १७/०४/०३ ची होती आणि ही घटना १०/०४/०३ ला घडली होती. त्यावेळी शिंदे साहेबांनी मला असे सांगितले की, अजून संपूर्ण माहिती आमच्याकडे आलेली नाही आणि आल्यानंतर आपल्याला तशी माहिती सभागृहात देण्यात येईल. महापौर मॅडम, आज माझ्याकडे सविस्तर टिपणी अधिकाऱ्यांनी दिलेली नाही. पण एकंदर वस्तुस्थिती पाहिल्यास असे दिसून येते की, ॲन्टी करप्शनने १०/०४/०३ या दिवशी त्यांना पकडलेले होते आणि १०/०४/०३ पासून ११/०६/०३ पर्यंत हा सोनारे कर्मचारी हा या महापालिकेत कार्यरत होता. ११/०६/०३ ला त्याला निलंबनाची नोटीस दिली आणि नोटीस देताना निलंबन १०/०४/०३ पासून आहे असे त्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे. म्हणजे जो अधिकारी दोन महिने कामाला आहे आणि स्थायी समिती, महासभा अशा कुठल्याही ठिकाणी त्याचा उल्लेख न होता आयुक्त साहेब आपल्या अधिकारामध्ये दोन महिन्यानंतर मागच्या दोन महिन्यापासून त्याला निलंबनाची नोटीस देतात. म्हणजे या आधी असा प्रकार झालेला आहे. त्याचे परिणाम सर्व नगरसेवकांना भोगावे लागले, अशाप्रकारचे ठराव म्हणजे सभागृहाला दिशाभुल करण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांकडून होत आहे. यामध्ये दुमत नाही. मा. महापौर मॅडम, मी आपल्या वतीने आता पिठासीन अधिकाऱ्यांना विचारणार आहे की, आपण जे निलंबनाचे आदेश ११/०६/०३ ला काढलेले आहेत. त्यामध्ये कुठल्या नियमाने ते निलंबन काढलेले आहे आणि त्या व्यक्तीने दोन महिने काम केलेले आहे. तर दोन महिन्याचा पगार कशा पध्दतीने दिलेला आहे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़े.):-**

सन्मा. सदस्य यांनी सभागृहामध्ये ज्या पध्दतीने या विषया संदर्भात चर्चा केली. या विषया संदर्भात ५६(ब) सेक्शन मी वाचून दाखवितो. आयुक्त, महापालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधीकरणाने नियुक्त केलेला असा कोणत्याही अधिका-यास कर्मचा-यास महापालिकेचा आदेश होईपर्यंत निलंबित करु शकेल.

**मिलन म्हात्रेः-**

महापालिकेचा आदेश म्हणजे स्थायी समितीचा नाही का? मग आपण का समजावे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़े.):-**

महापालिकेचा आदेश होईपर्यंत.

**मिलन म्हात्रेः-**

म्हणजे स्थायी समिती महापालिकेत नाही आहे का?

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़े.):-**

आयुक्तांनी त्याचमध्ये म्हटले आहे की, अशा प्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी असा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला कर्मचारी असेल तर असे निलंबन त्यासंबंधित आयुक्ताने ताबडतोब महापालिकेला कळविले पाहिजे. श्री. सोनारे हे ४८ तासापेक्षा अधिक काळ पोलिस कोठडीमध्ये होते. त्यामध्ये तांत्रिक मुद्दा उपस्थित झाला की, पोलिस कोठडीमध्ये ४८ तासापेक्षा जास्त काळ कोणी असेल तर कर्मचारी, लोकसेवक असेल तर त्यांना निलंबित करणे हे आवश्यक आहे आणि त्या तांत्रिक मुद्दयानुसार त्याला निलंबित करण्यात आले आहे

आणि त्यासंबंधी ॲन्टी करप्शन ब्युरो याच्याकडून आपल्याला अहवाल प्राप्त झालेला आहे. तो अहवाल ६/०५/०३ रोजी प्राप्त झाला आहे. धन्यवाद.

**मिलन म्हात्रेः-**

मला याच्यावर रुलिंग पाहिजे. वरचे जे आपण (अ) बोलतो आहे. यामध्ये एक हजार रुपये पेक्षा जास्त वेतन हे सोनारेला नाही आहे का?

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त साो.):-**

आपण ५६(अ) बाबत बोलता त्यासंबंधी बडतर्फीसाठी तो नियम लागू आहे. निलंबनासाठी नाही. सस्पेन्शन इज नॉट पनिशमेन्ट. निलंबन हे केव्हाही शिक्षा नसते. ती चौकशीसाठी निलंबन राहत असते आणि त्याला निलंबित करण्यात आलेले आहे आणि ते चौकशी अधिक निलंबन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दुसरे म्हणजे सूर्यवंशीचे जे नाव वाचले. त्याबददल काय? हा ठराव तुम्ही परत आणा. त्यामध्ये सूर्यवंशीचा कुठे उल्लेख नाही. पगार त्यावेळेला सूर्यवंशीला कुठलेही शासन देत नव्हते. नगरपालिका देत होती एवढे मला माहित आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय स्थायी समितीमध्ये घेऊ या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, एका गोष्टीचा खास करुन उल्लेख करावा लागेल. आपण आता अनुदान देण्याचा विषय आलेला होता. त्यामध्ये नमुद केलेले आहे की, सुट्टीच्या दिवशी येऊन काम करावे लागते. आता साहेबांनी ५६(अ) वाचून दाखविला तर ५६(ब) मध्ये असे आहे, सहा महिन्याचे निलंबन करु शकतो. सहा महिन्यापेक्षा अधिक काळ झाला आहे. साहेब, तुम्ही ५६(ब) बघा. म्हणजे महासभेमध्ये आणला नाही. स्थायी समितीमध्ये आणला नाही. सहा महिने झाल्यानंतर दहा दिवस जास्त झाल्यानंतर सभागृहात हा विषय येत आहे. म्हणजे आपण नियमाचे उल्लंघन करता.

**रोहिदास पाटीलः-**

मा. महापौर मॅडम आमची विनंती राहिल, एखादया विषयावर वेगळया पध्दतीचा वाद होईल तर तुम्ही सांगू शकता की, विषय थांबवा. इथे तांत्रिक मुददयावर चर्चा मांडत असेल. त्यामुळे महापालिकेला निलंबन बडतर्फ हे नवीन विषय नाही. हे नविन विषय नसतांना ही एक केस सोडून अशा अनेक केसेस या नगरपालिकेत, महानगरपालिकेत घडल्या. तरीसुद्धा हे प्रकरण हाताळण्यामध्ये आपण अनेक सल्लागार नेमले. आता सल्लागार पुन्हा बोलाविले. मी काल बोलता बोलता विचारले होते की, अजून आपल्याला किती सल्लागार पाहिजे म्हणजे महानगरपालिकेचे कामकाज नीटनेटके चालेल. हे सभागृहात निदर्शनात येण्यापेक्षा त्यांनी जर कायदेशीर बाब पडताळून प्रशासनाने हा ठराव आणला असता तर सभागृहाचा वेळ गेला नसता. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल असा विषय मांडतात की, जेव्हा तुमची कायदयातच तरतुद नाही. अधिका-यांनी विषय आणताना सहा महिने वेळ गेलेली आहे. त्या कर्मचा-याने दोन महिने मस्टरवर सहया केलेल्या आहेत आणि मग त्या आधीचे तुम्ही सांगता मग तुम्ही मस्टर तपासले होते का? तो कोर्टात जाणार आहे. तो आपणच कोर्टात जाणार नाही. तोही वाचण्याचा प्रयत्न करणार आहे. त्या दृष्टीकोनातून महापालिकेची बदनामी किंवा सभागृहाचा अपमान होईल, सभागृह अडचणीत येईल. हा विषय तांत्रिक कायदयाचा आहे. सभागृहाचा वेळ जातो आणि नको त्या माणसाला शिक्षा होते. जसे मघाशी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले दोन आरोपी आहेत. एक आरोपी आपला कर्मचारी नाही हे नक्की आहे. पण ते आपल्या हद्दीत घडलेले आहे. या प्रोसीडिंगमध्ये स्पष्ट यायला पाहिजे की, सूर्यवंशीना रंगेहाथ पकडले आणि ते त्यांचे कर्मचारी होते. त्यांच्या डिपार्टमेन्टने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. आपल्या कर्मचा-यांवर आपण आणि दुसरा मुद्दा आपणच कर्मचा-यांच्या टिपणीमध्ये लिहितो की, कर्मचारी रविवारी येतात. तो कर्मचारी रविवारी होता तर रविवारी आपण कामाला बोलावले होते की नव्हते हाही एक विषय आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

मा. महापौर मॅडम ५६(अ) जे आहे. वाचून दाखवतो. भत्ते वगळून ज्यांचे मासिक वेतन अधिक आहे अशा कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यांस, कर्मचाऱ्यास स्थायी समितीच्या पूर्वसंमती वाचून आयुक्ताकडून बडतर्फ केले जाणार नाही. बडतर्फ म्हणजे नोकरीतून कमी करणे कायमस्वरुपी. (ब)

वाचून दाखवतो, आयुक्तपदी प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन व्यवस्थापक वगळून महापालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधीकरणाने नियुक्ती केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचा-यास महापालिकेचा आदेश होईतोपर्यंत निलंबन करु शकेल व अशाप्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी हा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्ताने ताबडतोब महापालिकेस कळविली पाहिजे व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल. शब्दप्रयोग असा आहे की, महापालिकेची मंजुरी मिळेपर्यंत. आयुक्त निलंबन करु शकतात. मात्र, सहा महिन्याच्या आत महापालिकेसमोर आणायला पाहिजे. महापालिकेच्या समोर सहा महिन्याच्या आत आणले नाही तर निलंबन संपुष्टात येईल.

**मिलन म्हात्रे:-**

नाईकसाहेब, याच्यामध्ये असे आहे की, कोणताही अधिकारी डेफिनेशन तुम्ही वाचले आहे ना. तेच दुसऱ्या लाईनमध्ये दिलेले आहे. कोणताही अधिकारी म्हणजे दोघेही आले. त्याचे आम्हाला जरा डिक्लेरेशन दया.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

म्हणजे महापालिकेचा आदेश होईतोपर्यंत निलंबन करु शकेल. म्हणजे महापालिकेचे आदेश मिळण्याअगोदर निलंबन आयुक्त करु शकतील. असे पहिल्या वाक्यात आहे आणि खाली आहे निलंबन केल्यानंतर सहा महिन्याच्या आत निलंबन कायम करण्यासाठी महापालिकेसमोर आणले पाहिजे. सहा महिन्याच्या आत जर आणले नाही तर निलंबन संपुष्टात येईल असे खालच्या ओळीत आहे.

**प्रफुल्ल पाटील:-**

प्रथम सांगा आज जी सभागृहामध्ये आपण टिपणी सादर केली आहे. ही कोणाच्या सहीने केलेली आहे.

**संजय पांगे:-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये किती आयुक्त आहेत? प्रकरण क्र.४५ मध्ये गोषवाऱ्यामध्ये आर. डी. शिंदे साहेबांची सही आहे आणि प्रकरण क्र. ४६ मध्ये खामतकर साहेबांची सही आहे. म्हणजे या सभागृहामध्ये किंवा या महानगरपालिकेमध्ये आयुक्त किती? महासभेची जी सुचना काढलेली आहे. त्या सुचनेमध्ये असे म्हटलेले आहे की, सभागृहात महासभा सुचना क्र.७ दिनांक ९/१०/०३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवर विचार करण्यासाठी ही सभा बोलावण्यात येत आहे. ९/१०/०३ रोजी आयुक्त पदावर कोण होते? त्यामुळे हे जे प्रकरण क्र. ४५ मांडले आहे. हा जो प्रस्ताव मांडला आहे. हा पूर्णपणे इनव्हॅलीड आहे. यानंतर एक सभा झाली. नंतर नगरविकास सचिवसाहेब निर्णय घेतील. हा जो प्रस्ताव मांडला आहे. तो व्हॅलीड आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल:-**

प्रत्येक वेळी सभागृहाची दिशाभुल करायची आणि शेवटी कोर्टामध्ये गेले तर महापालिकेची बदनामी महापालिकेच्या नगरसेवकांची होते. अशा पध्दतीने सभागृह चालत असेल तर ते सभागृह व्हॅलीड नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

जो गोषवारा आहे आणि गोषवा-यावर जी सही आहे. शिंदेसाहेबांची सही आहे. त्यांनी आयुक्त म्हणून सही केलेली आहे आणि ते आयुक्त म्हणून त्याला जबाबदार राहतील आणि सभागृहात जे सांगितले सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी की, सभागृहात त्यांची स्वतःची स्वाक्षरी असल्यामुळे सभागृह त्याला दोषी नाही.

**संजय पांगे :-**

मला एकच म्हणायचे आहे की, ९/१०/०३ रोजी सचिवांनी जे पत्र काढलेले आहे. त्यावेळी आयुक्त कोण होते?

**ओमप्रकाश अग्रवाल:-**

सभागृहात विषय का आणायचा? आयुक्तांनीच निर्णय घ्यायचा होता.

**संजय पांगे :-**

साहेब, गोषवाराच इनव्हॅलीड ठरतो. आपण हा प्रस्ताव मागे घ्या आणि पुढच्या सभेला घ्या.

**प्रफुल्ल पाटीलः-**

सभागृहात विषय मागे घेण्याचेदेखील दिवस राहिलेले नाहीत. तुम्हाला सर्वांना फासावर जायचे असेल तर तसे म्हणा. मा. पिठासीन अधिकारी स्पष्टपणे सांगा की, आपले आजच्या तारखेला आयुक्त कोण आहेत?

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़ो.):-**

आजच्या तारखेला आपल्या महानगरपालिकेचा अतिरिक्त पदभार श्री. खामतकर साहेबांकडे आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

अतिरिक्त असे म्हणू नका. अतिरिक्त पदभार आपल्याकडे दिलेला आहे. मेन आयुक्त ते आहेत. अतिरिक्त पदभार कोणाला देता येत नाही. कमिशनर हॅज टु बी सबस्टिट्युटेड बाय ॲडिशनल कमिशनर ओनली. त्यांच्या जागी ॲडिशनल कमिशनर नेमता येत नाही. सेक्शन ३९ बघा. जेव्हा आयुक्त हे रजेवर गेले. प्रशिक्षणासाठी असो किंवा कशासाठी असोत. स्टेट गव्हर्नमेन्ट अपॉइन्टमेन्ट करते. आम्ही अपॉइन्ट केले नाही. खामतकर साहेबांची कोणी अपॉइन्टमेन्ट केली.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़ो.):-**

राज्यशासनाने श्री. खामतकर साहेबांची अपॉइन्टमेन्ट केलेली आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

राज्य शासनाने जेव्हा ३९ खाली त्यांची अपॉइन्टमेन्ट केली तर ज्या पावर्स शिंदे साहेबांना प्राप्त होत्या. त्या पावर्स मा. आयुक्त खाकतकर साहेबांना प्राप्त झाल्या आणि मग ते जर आयुक्त असतात. तर मागच्या आयुक्तांची टिपणी कशी आली? हा महत्वाचा भाग आहे. तुमच्याकडे अतिरिक्त भाग असेल तर तुम्ही त्याचे उत्तर दया. पण हा प्रसंग आयुक्त साहेब असताना झालेला आहे. शिंदे साहेब आयुक्त पदावर असताना ही घटना घडली. ही घटना घडल्यानंतर त्यांनी ५६ चा आधार घेऊन त्यांना निलंबित केले. आता तुम्ही सांगता ते स्थायी समितीसमोर घ्या. निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याला काय स्थायी समितीपुढे घेता येते का? अपील इन ॲथोरिटी कोण आहे? कुठली शास्ती तुम्ही लादली ५६(अ) खाली तर ती त्यातील सगळया शास्ती ज्या आहेत. ज्या आहेत सस्पेनशन सोडून हे रिडक्शन इन रँक डिसमिसल या सगळया शास्ती ज्या आहेत. त्यासाठी अपील त्या कर्मचाऱ्याला स्थायी समितीमध्ये आहे. आता स्थायी समितीचा स्कोप संपला आणि आता कुठे कुठे स्थायी समितीला पाठवतात. स्थायी समितीचा स्कोप संपला आणि कार्पोरेशनचा पण स्कोप संपला. तुमच्या लोकांच्या मनात जर त्यांना कर्मचाऱ्यांना घ्यायचे होत तर हा विषय आणायचा कशाला? ऑलरेडी सिक्स मन्थस हॅज बीन ओव्हर नाव यु कान्ट टेक डिसिजन ऑन दॅट. हे जर तुम्ही निर्णय घेतला तर तुम्ही त्याला कारणीभूत व्हाल. कारण ॲन्टी करप्शन ब्युरोची केस चालू आहे. केस कुठलीही चालू असताना त्याचे निलंबन सहा महिन्यापेक्षा जास्त काळ करता येत नाही. म्हणजे तुम्हाला आता सहा महिने राहिले का? दहा तारखेला तुमचे सहा महिने पूर्ण झाले. आजची तारिख १७ तारीख. आज काहीही निर्णय आम्ही घेतला तरी कोर्टात गेल्यानंतर १७ झाली. कोर्टात गेल्यानंतर सहजच तो कर्मचारी आमच्या नगरपालिकेमध्ये येईल आणि मग त्याच्यानंतर काहीही राहणार नाही. तुम्ही जर निलंबन रद्द केले किंवा ते समाप्त झाले तर त्याच्याने काही केसवर परिणाम होणार नसेल तर मग ॲन्टी करप्शनने दिलेला अहवाल समोर आणायला नको का? तुम्ही एक सांगता की, आयुक्त हे ह्या ह्या कायदयानुसार निलंबनाचा निर्णय घेतला. त्याच कायदयानुसार आयुक्तांची जबाबदारी नाही का सभागृहाला कळविण्याची? त्यांना कधी वाटले नाही की, ही जबाबदारी कळवावी. कारण ॲन्टी करप्शनची केस ही साधी नाही. मागेसुध्दा आपले हात पाय भाजलेले आहेत. पोळले आहोत आपण. जर कोणी आले असतील कायदेशीर तज्ञ तर त्यांनी जरुर मांडावे याच्यापुढे की, जेव्हा सेक्शन ३९ खाली कमिशनर झालेल्या सगळया सभामध्ये त्यांच्या टिपणीत त्यांच्या सहीने येत नसतील दिस इज वन काइन्ड ऑफ फ्रॉड क्रिएटेड बाय द ॲडमिनिस्ट्रेशन इज लायबल फॉर द प्रोसीफीकन फॉर दिस आणि म्हणून अशाप्रकारचा ठराव मी मांडतो की, ज्याने निलंबनाचा प्रस्तावाची मान्यता सहा महिने पूर्ण झाल्यावर मॅडम आम्ही त्याला मान्यता देउ शकतो. वुई आर इलिजिबल फॉर दॅट. या केसचे गांभीर्य फक्त बघायचे आहे. सोनारेवर कोणाचे किती प्रेम आहे. सोन्यासारखे आहे की, लोखंडासारखे आहे, याला महत्व नाही. कायदयात तुम्हाला काय तरतुदी आहेत आणि कायदयात कालमर्यादा आहेत याचा विचार न करता कुठलाही ठराव जर असा घेतला तर तो स्थायी समितीपुढे घ्या किंवा आज त्याच्यावर

निर्णय न घेता तो पुढच्या सभेला आणा. तर त्याचे निलंबन आपोआपच रद्द झालेले आहे. या सभेलासुध्दा आम्हाला असा ठराव करता येणार नाही. कारण या सभेला सुरु होण्याच्या तारखेला ऑलरेडी सहा महिन्याचे निलंबन पूर्ण झालेले आहे आणि तुम्हीच सांगता की, मा. कमिशनर ही बाब त्याच्या अधिकारामध्ये केलेली असताना रिपोर्टींग ॲथॉरिटी कार्पोरेशन आहे. सभागृह आहे हे नगरपालिका आहे. नुसती मा. स्थायी समिती नाही. स्थायी समिती कधी असती जर त्यांना काही पेनल्टी लावली असती त्यांनी त्यांना डिसमिस केले असते. कारण त्यांना खालच्या पोस्टरवरती आणले असते. त्यांना प्रमोशन देतो. त्याच्यावरती डिमोशन दिले असते तर त्या कर्मचा-याला तिथे अपील करायचे आहे. परंतु, पर्टीक्युर्लली ही केस ॲन्टी करप्शनखाली झालेली आहे. ॲन्टी करप्शनने ७, ८, ९, १०, ११, १३ सगळे नंबर बाद याच्यामध्ये ४८ तासापेक्षा जास्त त्यांना कैद झालेली आहे. म्हणून त्यांना निलंबित केलेले आहे. ॲन्टी करप्शनचा गुन्हा काय आम्ही सापळा रचला नव्हता. वुई आर नॉट फॉर द पार्टी ऑफ दॅट. आम्ही एखादया कर्मचाऱ्याला शासन कधी देतो. जेव्हा नगरपालिकेमध्ये तो चुका करतो तेव्हा शासन देतो. ही बाब नगरपालिकेच्या बाहेर घडलेली आहे. याच्यामध्ये नगरपालिकेच्या कुठल्याही अधिकाऱ्याने त्यांना तसे काही सांगितले नाही. पण ॲन्टी करप्शनच्या कायदयाखाली त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे. त्यासाठी तुमच्याकडे मंजुरी मागीतलेली असेल ती तुम्ही समोर आणली नाही. कारण जोपर्यंत आम्ही आमच्या कर्मचा-याला मंजुरी देत नाही म्हणजे ॲन्टी करप्शनच्या प्रपोजलला. तोपर्यंत तुम्ही निलंबनासाठी का आणता? म्हणजेच सगळेच आमच्यापुढे लपवून ठेवता? सहा महिने ॲन्टी करप्शनने त्याच्यामध्ये काय केले असेल तर तेही तुम्ही लाल कपडयामध्ये बांधून ठेवले आहे का? जर ॲन्टी करप्शनने काही रिपोर्ट दिला असेल तर या सभेपुढे सादर करा आणि या सभेपुढे तुम्हाला आता निलंबन कायम करता येणार नाही. तर निलंबन कायम करण्याची वेळ निघून गेलेली आहे. जर ॲन्टी करप्शनने आम्हाला अहवाल दिला असता आणि त्यांनी सांगितले असते की, आमची चौकशी अजून बाकी आहे. तर निलंबनाचा काळ वाढविण्याची आम्हाला ॲन्टी करप्शन कायदयाखाली तरतूद आहे. बी.पी.एम.सी. ॲक्टखाली तरतूद नाही. म्हणून चुकीचे कायदे कृपया लावू नका. चुकीची माहिती आमच्या सहकार्यांना देऊ नका. मघाशी म्हटले तसे वेगळे काही बोलण्याची गरज पडणार नाही. सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील साहेबांना मोठी आस्था वाटली की, इतर काही लोक बोलतात व कायद्याचे किस काढतात. कायद्याचे किस नाही काढणार तर काय करणार? तुम्ही आम्हांला माहिती सर्व चुकीची सांगता आणि मग मॅडमनी असे रुलिंग दिले की, स्थायी समितीला घ्या. तर ते चुकीचे होत आहे. मी तुम्हाला वेगळे काही बोलणार नाही कारण तुमच्याकडे जी माहिती आहे. त्यावरच तुम्ही रुलिंग देणार आणि जर असे रुलिंग रेकॉर्ड झाले आणि याची चौकशी झाली तर काय होणार? तुमच्या सकट आम्ही सगळे. म्हणून कृपया अशा प्रकारची कुठलीही माहिती देऊन याच्यापुढे काळयावर सफेद आणि सफेदवर काळे करुन चालणार नाही. कृपया तुम्ही सगळया प्रोव्हीजन बघा. एकतर कमिशनरने याच्यावर कुठल्याही टिपणीवर सही केलेली नाही. आपण जे आपले सेक्शन ३९ इन रिप्लेसमेन्ट अर्लिअर कमिशनर म्हणजे त्यांना सगळया पावर्स आल्या. तुम्हाला काही पावर्स डेलिकेट केल्या असतील तर तुम्ही तुमच्या सहीने मला काही नोट दया. ती पण दिली नाही. खामतकरसाहेबांच्या सहीची नोट नाही. शिंदेसाहेबांनी कधीतरी नोट पाठविली असेल आणि मग जाणूनबुजून स्थायी समितीने किंवा महापौर मॅडमने आणली की नाही सभागृहामध्ये असा त्याचा उदया अर्थ होईल. ते म्हणतील की, मी कधीच टिपणी दिलेली आहे. तुम्हीच आणली नाही. सहा महिन्याच्या आत टिपणी आणली असती. इटस बीकम इनडारेक्टली युवर रिस्पॉन्सिबिलीटी. हे तुम्ही लक्षात घ्या की, शिंदे साहेबांनी सही करुन रिपोर्ट तयार केला. त्यांची फाईल काय सांगणार मी सस्पेन्शन दिल्याबरोबर सस्पेन्शन कायम केल्याबददल महापालिकेला कळविले. म्हणजे कोणाला पीठासीन अधिकाऱ्यांना कळविले. पिठासीन अधिकाऱ्यांनी आतापर्यंत जेवढया सभा झाल्या त्याच्यात विषय घेतला नाही. म्हणजे सस्पेन्शन त्यांचे कायम होऊ शकणार नाही अशी परिस्थिती असताना हु इज रिस्पॉन्सिबल फॉर दिस तर पिठासीन अधिकारी किंवा सचिव आणि म्हणून या सगळया प्रकरणाचा बाऊ न करता कुठलाही निर्णय न घेता याचा संपूर्ण अहवाल सादर करा. याच्यामध्ये जे दोषी आहेत त्यांनी हा प्रस्ताव आमच्यासमोर ठेवला नाही. आम्हाला काय सोनारेला फाशी दयायची नाही. आम्हाला काय सूर्यवंशीला फाशी दयायची नाही. त्यांचे जे काही प्रकरण झाले ते ॲन्टी करप्शनशी संबंधित आहे. आमच्या नगरपालिकेशी संबंधित नाही. फक्त एम्लॉईंग ॲथॉरिर्टी अपॉइन्ट कोण करतो? आम्ही करतो सोनारेना, नाहीतर सूर्यवंशीला.

पण आम्ही तसेच केले असते. म्हणून सूर्यवंशीवर आम्ही काही कारवाई करु शकलो नाही. सोनारेवर कारवाई करायला नगरपालिका ही त्याची अपॉइन्टींग ॲथॉरिटी असल्यामुळे आम्हाला हा निर्णय घ्यायचा आहे आणि जेव्हा अपॉइन्ट ॲथॉरिटीला हा निर्णय घ्यायचा आहे. तेव्हा सगळी अपॉइन्टींग ॲथॉरिटी, जबाबदारी, त्याच्या लायबिलिटी सगळे आमच्या होणार आहेत. या सभागृहाचे होणार आहेत. मॅडमचे एकटयाचे होणार नाहीत. सचिवांच्या नाहीत. तर सर्व सभासदांचे होणार आहेत. सभासदाची मान्यता मिळत असेल तर मंजुरी दयावी. म्हणून या स्टेजला कुठलेही सस्पेनशन करु शकत नाही, आणू शकत नाही, रदद करु शकत नाही असा मी येथे ठराव मांडतो आणि जर या संबंधी पुन्हा काय करायचे असेल तर ॲन्टी करप्शनचा पूर्ण अहवाल मागवा. त्यांनी जर तुमच्याकडे मंजुरी मागितली की, आमची कारवाई अपूर्ण आहे. आम्हाला अजून अवधी वाढवून दयावा. तर त्यासाठी पुन्हा विषय ठेवा. तर त्याला कायदेशीर रुप प्राप्त होईल. धन्यवाद.

**प्र. सचिवः-**

सदरचा गोषवारा माझ्याकडे माहे सप्टेंबरची महासभा झाल्यानंतर माझ्या सचिव कार्यालयात आलेला आहे. त्याप्रमाणे मी येत्या महासभेत म्हणजे आता जी सभा आहे. त्यामध्ये मी सादर केलेला आहे.

**मोहन पाटीलः-**

अशा चुकीच्या पध्दतीने हा प्रस्ताव ठेवत असाल तर आणि जर प्रशासन अडचणीत आणायचा प्रयत्न करित असेल तर आपण कायदयाचा किस काढून त्याचा विचार केला पाहिजे. आपण कायदयाने बघितले पाहिजे. मग आपण तो प्रस्ताव आणताना निलंबनाचा विषय आणल्यानंतर त्याचे कोणत्या तारखेला निलंबन झालेले आहे. मग आपण त्याचा कोणता निकष लावलेला आहे. पोलिस स्टेशनला केस नोंदली गेली. तो निकष लावला की, सस्पेन्ड झाला तो निकष लावला की, केस झाली तो निकष लावला. तो निकष सुस्पष्ट आपण करायला पाहिजे. जेव्हा सचिव या नात्याने महापौरांकडे जाऊन तो विषय आपण आणतो. तेव्हा तो विचार केला पाहिजे आणि तो विचार न करता सभागृहामध्ये अशा प्रकारचे वातावरण निर्माण होते आणि त्यामध्ये बॉडी अडचणीत येते असा कोणताही विचार न करता महापौरांना विषय जो नोव्हेंबरमध्ये दिलेला आहे. म्हणजे इन पिरिएड तो विषय दिलेला आहे. मा. आयुक्तांनी जी टिपणी दिलेली आहे ती अगोदरची टिपणी दिलेली आहे.

**प्र. सचिवः-**

मागची सप्टेंबरची जी सभा होती. ती सभा झाल्यानंतर सचिव कार्यालयात हा गोषवारा आलेला आहे. म्हणजे मागच्या सभेचा याच्याशी काही संबंध नव्हता. माझ्या माहितीप्रमाणे ऑक्टोबरच्या सभेसाठी आलेला होता.

**मोहन पाटीलः-**

म्हणजे याचा अर्थ की, कोणत्याही पध्दतीने आपल्याला सभागृहामध्ये कोणी अडचणीत येउ नये अशा पध्दतीने झाले पाहिजे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजी आपण चांगला अभ्यास करता. त्याबददल दुमत असण्याची गरज नाही. सगळयांचे ते मत आहे. मी फक्त गटनेत्यांच्या विषयी अशा पध्दतीने बोललो. जर गटनेत्यांनी अशा पध्दतीने सभा कंट्रोल केली तर सभा लवकर होउ शकते आणि आपल्यासारख्यांनी चांगले जर चांगले दोन शब्द सांगितले नियमाचे. आपण मित्रत्वाने दोन शब्द सांगितले तर जरुर स्वागत करु. धन्यवाद.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि ओमप्रकाश गोडोरिया यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, याला सहा महिन्यापेक्षा अधिक काळ झालेला आहे. सहा महिन्यापेक्षा अधिक काळ झालेला नाही. संबंधित कर्मचा-याचे निलंबन ११/०६/०३ रोजी करण्यात आलेले आहे. तेव्हापासून जर आपण मोजले तर फक्त चार महिने होतात. सहा महिन्याचा कालावधी झालेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

तुम्ही चुकीची माहिती देता. निलंबन किती तारखेपासून आहे ते वाचा.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

निलंबनाचे आदेश मी स्पष्ट वाचून दाखवितो. आदेश क्र. मिरा भाईंदर नगरपालिका म.न.पा. आस्था सो ॲन्ड सो दिनांक ११/०६/०३ ज्याअर्थी आपणास दिनांक १०/०४/०३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने लाच घेताना पकडून मिरा रोड पोलिस स्टेशन येथे १०/०४/२००३ रोजी गुन्हा

दाखल केला असून त्या अनुषंगाने आपली चौकशी करण्यात येत आहे. त्यामुळे आपण महापालिका सेवेत राहिल्यास चौकशीत अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याअर्थी मी आर.डी.शिंदे आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका स्वतः मुंबई प्रान्तिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५६ अंर्तगत तरतुदी अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन दिनांक १०/०४/०३ मध्यान्वयानंतरपासून निलंबित करित आहे. आपणास पुढे असेही आदेश देत आहे की, निलंबन कालावधीत आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या लेखी परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

म्हणजे १०/०४/०३ पासून ज्या दिवशी पकडले त्या दिवसापासून.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

आता कायदा वाचून दाखवतो. ॲक्टमधील प्रोव्हीजन वाचून दाखवितो.

**आसिफ शेखः-**

निलंबन कोणत्या तारखेपासून केले हा मुद्दा आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

आपण स्पष्टीकरण देताना १/१ नुसार घ्या. आपल्याला जे वाटते आम्हाला वाटते त्यावर चर्चा होऊ दे. १०/०४/०३ रोजी त्यांचे निलंबन झाले असा आदेशात म्हटले आहे.

**आसिफ शेखः-**

सन्मा. जेष्ठ सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी जो प्रकाशझोत टाकलेला आहे. तर त्यांच्या मताशी मी सहमत आहे. जर त्यांचे निलंबन १०/०४/०३ पासून झाले असेल तर सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झालेला आहे आणि महासभेत आणण्याची काही आवश्यकता नव्हती. परंतु, प्रशासनाने अत्यंत चुकीच्या पध्दतीने हा इकडे प्रस्ताव आणलेला आहे. मागच्या स्थायी समितीमध्ये पण तेच प्रकरण झाले की, एकदा परवानगी दिल्यानंतर पुन्हा फेरविचार करण्यासाठी परवानगी सभागृहात आणलेली. तेव्हा पण मी सांगितले की, प्रशासनाने चुका करायच्या आणि आमच्या खांदयावर ओझे दयायचे. कुणाच्या खांदयावर कुणाचे ओझे या पध्दतीने प्रशासनाचा कारभार चालू आहे. मी स्थायी सभेत पण तेच बोललो. आता पण तेच बोलत आहे. शिंदेसाहेब रजेवर गेले. ती गोष्ट पण बरोबर आहे आणि कलम ३९ अन्वये हंगामी आयुक्तांची नेमणुक राज्यशासनाने ऑर्डर केली तर त्यांची सही हयावर पाहिजे. म्हणजे हे इनव्हॅलीड आहे. तर कृपया संपूर्ण अहवाल आपल्याकडे आलेला असेल. ॲन्टी करप्शन ब्युरोचा तर तो अहवाल सभागृहापुढे ठेवून पुन्हा प्रस्ताव आणावा. प्रशासनाने आपल्या अखत्यारित निर्णय घ्या. सभागृहातील कोणताही सदस्य या प्रकरणात काडीमात्र संबंध नाही. कृपया नगरसेवकांना आपण अडचणीत आणू नका. आपल्याला निर्णय घ्यायचा तर आपण सक्षम आहात तर आपण आपल्या अखत्यारित निर्णय घेउन मोकळे व्हा. सभागृहाचा वेळ वाया घालवू नका. दुस-याच्या खांदयावर विनाकरण कशाला बंदूक ठेवता. तुम्हालाच माहित आहे. काय झाले ते. मागचा इतिहास जर बघितला तर ते सुध्दा तसेच झालेले व आम्हालाच जबाबदार ठरविलेले आहे. आमचा कुठल्याही प्रकरणात संबंध नसतो. तुम्हाला जे योग्य असेल ते तुम्ही करा. मला वाटते् हा जो प्रस्ताव आलेला आहे तो प्रस्ताव आम्ही फेटाळून लावतो आहे असा मी ठराव मांडतो आहे.

**तुळशीदास म्हात्रेः-**

मा.महापौर मॅडम, जेव्हा हा विषय विषयपत्रिकेवर येतो निलंबनाचा किंवा इतर तेव्हा तुम्ही अधिका-यांची सभा घेत नाही असा अर्थ होते आणि त्याशिवाय तुम्ही विषय आणता विषयपत्रिकेवर सभागृहात सभागृहाचा टाईम वेस्ट होतो. माजी सभापतीसाहेब वास्तविक महापौर मॅडमनी आणि या अधिका-यांनीसुध्दा मा. महापौरांना विश्वासात घेउन प्रश्न आणले पाहिजेत. विश्वासघात करण्याचा प्रयत्न करु नका. विश्वासात घेउन प्रश्न आणले पाहिजेत, अशामुळे हया सभागृहाचा वेळ वाया जातो.

**मोहन पाटीलः-**

संपूर्णपणे गोषवारा चुकलेला आहे. मा. आयुक्त साहेबांनी वेळेत दिलेला होता. वेळेत दिल्याप्रमाणे हे उशीरा कसे झाले आणि डीले झाले तर उदया होणा-या परिणामावर जबाबदार कोण?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी प्रश्न विचारला होता सभेत मला सांगितले पुढच्या सभेत सांगतो. आमच्याकडे अहवाल नाही. निलंबन रद्द ज्या दिवशी पकडला त्या दिवशी केले. मी सात दिवसानंतर प्रश्न विचारला होता.

**मोहन पाटील :-**

अशा प्रकारे प्रशासनाने काटेकोरपणे नियमाचे पालन केले पाहिजे. बॉडी सानुग्रह अनुदान मोठ्या मनाने तुम्हाला देते आणि अशा पद्धतीने जर तुमचे विषय येत असतील. त्या विषयामध्ये बॉडी अडचणीत येत असेल तर तो विषयच कशाला आणला.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आश्चर्याची गोष्ट आहे या ठिकाणी. शिपाई सगळे तेथे उभे आहेत. नगरपालिका त्यांच्या हवाली करा असे मी बोलतो या ठिकाणी आणि पाणी घेऊन येथे बाहेरचे लोक येत आहेत. हा काय प्रकार चालला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता सभागृहापुढे असा संभ्रम निर्माण झाला आहे की ज्याचे निलंबन कायम करायचे. त्याची वेळ संपली. त्याच्यावर नेमका आम्ही काय निर्णय घ्यायचा. कारण एन्टी करप्शनने टाकलेल्या धाडीमध्ये हा गुन्हा त्यांनी नोंदविलेला आहे. महापालिकेचा आपल्याकडे कुठल्याही अधिकाऱ्यांनी त्यांना ती शिक्षा दिलेली नाही. जर आयुक्तांनी आपल्या कुठे नगरपालिकेमध्ये अपहार किंवा कुठलाही अपराध केला असता तर आपण त्यांना शिक्षा दिली असती आणि ती शिक्षा दिल्यानंतर म्हणजे आयुक्तांनी दिली असेल ती दिल्यानंतर त्यांना स्थायी समितीमध्ये अपील करायचा अधिकार असतो. स्थायी समितीने ऐकले नाही तर ते आपल्याकडे अपील करतात म्हणजे तुमच्याकडे अपील करणार आणि सभागृहाला वाटले तो निर्दोष आहे तर त्याची चौकशी चालु ठेवा आणि त्याला कामावर घ्या असे सभागृह करु शकतो. म्हणजे मी काय करु शकतो आणि काय करु शकत नाही हे सांगतोय. त्याच्यावर आपण निर्णय घ्या. पण आता काय झाले सहा महिन्याचे निलंबनाचा कालावधी संपलेला आहे. दरम्यानच्या काळामध्ये ॲन्टीकरप्शनने कुठेपर्यंत हे प्रकरण नेलेले आहे. दोघांच्यावर गुन्हा दाखल केला पण चार्जशीट दाखल केलेले नसते. चार्जशीट दाखल करायला जर त्यांनी परवानगी मागितली नसेल आणि असेल तर ती आपण दिली पाहिजे. खटला दाखल करण्यांची मंजुरी कारण तुम्हाला सांगतो ह्याच्यामध्ये जर आम्ही मंजुरी दिली नाही तर एन्टी करप्शन द प्रवीएशन ॲन्ड करप्शन ॲक्ट १९८८ चॅप्टर ५ खाली १९ कलमामध्ये असे एक डिसीजन झालेले आहे की ७, १०, ११, १३, १५ ह्या एन्टी करप्शनच्या कलमाअन्वये जो गुन्हेगार आहे. त्या गुन्हेगारावरती खटला दाखल करण्यांची मंजूरी म्हणजे शिक्षा नव्हे. तो खटला दाखल करण्यांची मंजुरी जर आम्ही दिली नाही तर कुठली केस इथे स्टँड होत नाही. आणि ॲन्टी करप्शन ॲक्ट जो आहे. त्याचा सात नंबर आहे तो ह्यांना लागु होतो कारण त्यांनी लाच स्विकारलेली आहे. त्यासाठी आमच्या महापालिकेचा कुठला अधिकारी नाही. जो अधिकारी होता तो प्रतिनियुक्तीवर होता. आमचा तो कर्मचारी असल्याने ॲन्टी करप्शनने आमच्याकडे खटला दाखल करायला परवानगी तर मागितली असेल तर तसा विषय आपण घ्या. जर ॲन्टी करप्शनने चार्जशीट पूर्ण केला नसेल तर याचा अर्थ चार्जशीट पूर्ण करण्यांसाठी अजुन त्यांना चौकशी करायची बाकी आहे. मग ॲन्टी करप्शनने तुम्हाला विनंती केली पाहिजे. महापौर आणि कमिशनरना आम्हाला अजुन ह्याची चौकशी करायची आहे तर आम्हाला वेळ वाढवुन द्या आणि जर ती योग्य वाटली तर हे सभागृह फक्त ॲन्टी करप्शनच्या केसमध्ये. इतर कुठल्याही केसेसमध्ये आम्ही सहा महिन्यापेक्षा जास्त निलंबन करु शकत नाही असे शासनाचे जी. आर. आहेत. बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये अशी प्रोव्हीजन नाही. जर त्यांनी सांगितले की आमची चौकशी अपूर्ण आहे. निलंबन करायला अजुन आम्हाला वेळ द्या. तर आम्ही निलंबन वाढवू शकतो. पण हे पण आपण लक्षात ठेवा की, निलंबित केलेला कर्मचारी ही केस झालेली आहे. हायकोर्टामध्ये कवळे विरुद्ध राज्यसरकार जर त्यांची चौकशी चालू आहे. कोर्टात केस उभी राहिल्यानंतर जो पर्यंत कुठलाच फायनल रिपोर्ट झाला नाही. निलंबन काळामध्ये चौकशी चालू आहे किंवा ह्यांनी चार्जशीट दाखल केली नाही. तर असला कर्मचारी निलंबित ठेवता येत नाही. कमीत कमी ॲन्टी करप्शनला चार्जशीट दाखल करावी लागते. आणि जर ॲन्टी करप्शनने चार्जशीट दाखल केलेली नसेल तर उद्या तो कर्मचारी गेला तर उदयाच्या उदया त्यांना स्टे मिळेल आणि त्यांचे निलंबन रद्द होईल. पर्यायाने या दोन्ही गोष्टी अधिन राहुन म्हणजे ॲन्टी करप्शनचा रिपोर्ट मागवावा. त्यांना निलंबनाचा काळ वाढवून पाहिजे आहे का, ते मागवावे आणि जर त्यांनी चार्टशीट दाखल केलेला असेल आणि ते चार्टशीट दाखल करण्यासाठी आमची मंजुरी लागत असेल या दोन्ही बाबींचा स्पष्टीकरण किंवा पुर्तता झाल्यानंतर त्यांचे निलंबन पूर्ण झाले असे समजुन त्यांना तुम्हाला पुन्हा कामावर घ्यावे लागेल असा मी ठराव मांडतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि आमचे सहकारी मोहन पाटील कायदयाचा कीस काढुन जी वैचारिक चर्चा उपस्थित केली ती स्वागतार्ह आहे. माझे लक्ष सभागृहाच्या एका विशेष गोष्टीकडे वेधण्याचा मी प्रयत्न करतो की निलंबनाच्या संदर्भात आणि हा जो गोषवारा ४५ प्रकरणाचा आपल्याकडे दिलेला आहे. त्यामधील वाक्यरचना पाहता १०/०४/०३ गुन्हा दाखल केल्याने निलंबित केले आहे. ही टीप वाचताना असा एक समज होतो की सन्मा. आयुक्त साहेबांनी संबंधित कर्मचाऱ्याला रिप्रोस्पेक्टीव्ह की पूर्वलक्षित प्रभावाने १०/०४/०३ पासून निलंबित केलेले आहे. तर तसे नाही तो गुन्हा १०/४ चा गुन्हा मिरा रोड पोलिस स्टेशनला नोंदलेला आहे आणि संबंधित कर्मचाऱ्याचे निलंबन हे ११/०६/०३ पासून केलेले आहे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त साो.):-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यामध्ये आदेश जरी ११/०६/०३ चा आहे त्यामध्ये मा. आयुक्त साहेब यांनी असे म्हटले आहे की, आपणांस दिनांक १०/०४/०३ पासुन मध्यरात्रीनंतर पासुन निलंबित करित आहे.

**लिओ कोलासो :-**

हाच प्रश्न आहे. मा. आयुक्त साहेबांना पूर्वलक्षित प्रभावाने एखाद्या कर्मचाऱ्याला निलंबित करता येते का? येत असेल तर हे प्रकरण डिबार्ड झालेले आहे. त्याची सहा महिन्याची मुदत संपलेली आहे असा त्याचा अर्थ होईल. आणि आपोआप हे निलंबन रद्द होत आहे असा त्याचा अर्थ होईल. याचा आपण खुलासा करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याच्यामध्ये सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी बरोबर प्रश्न विचारलेला आहे पुर्वलक्षी प्रभावाने त्यांना निलंबित करता येते का? तो प्रभाव तुम्ही ॲन्टी करप्शन ॲक्टमध्ये वाचा. त्याच्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की ४८ तास सेवकाला जर कैद झाली तर त्याला ताबडतोब निलंबित दुसऱ्या दिवसांपासुन होतो. त्याच्यामध्ये निलंबित हे १० तारखेपासुन झालेले आहे आणि ते १० एप्रिल पासून झालेले आहे आणि आता त्यांचा कालावधी संपलेला आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे दोन गोष्टीचा अहवाल मागवावा आणि त्यांना निलंबित कर्मचाऱ्यांना तुम्हाला पेन्डींग इन्क्वायरी कामावर घ्यावे लागेल. नाहीतर पुन्हा आमच्यावरती लायाबिलीटी येईल आणि पुन्हा जर आम्ही त्यांना घेतले आणि कायद्याच्या काही अडचणी निघाल्या आणि पुन्हा जर निलंबित केले तर टोटली केस कोलॅप्स होऊन जाईल आणि आम्हीच पुन्हा अडचणीत येऊ म्हणुन दोन्ही रिपोर्टस मागवा आपण जर त्याचा चार्जशीट पूर्ण झाला असेल तर चार्जशीटला मंजुरी द्यावी. खटला दाखल करण्यांसाठी खटला चालेल तेव्हा त्याला शिक्षा होईल. तो आज आरोपी म्हणून उभा आहे. प्रत्यक्ष आरोपी झालेला नाही म्हणजेच त्याच्यावर आरोप ठेवलेले आहेत जेव्हा खटला चालू होईल सुनावणी होईल त्याच्यानंतर जर सिद्ध झाले तर त्याला शिक्षा कोण करणार आहे? जेव्हा आम्ही त्याला शिक्षा देणार नसलो तर मग आम्हाला निलंबनाच्या बाबतीत त्याचे गांभीर्य घेण्याचे काही कारण नाही. सहा महिने गेलेले आहेत त्यांना तुम्हाला सर्विसला घ्यावे लागेल. मीनटाईम सर्व्हिसला घेण्यापूर्वी ॲन्टी करप्शनचा रोल चार्टशीट पूर्ण करण्यामध्ये किंवा जर चौकशी बाकी असेल तर त्यांनी तुमच्याकडे कालावधी वाढवून मागितला आहे का? तर तुम्हाला त्याला निलंबित ठेवता येईल आणि निलंबित कर्मचाऱ्याला तुम्ही सर्व्हिसला घेतले तर तो काही अपराधातुन सुटला असा त्याचा अर्थ होत नाही. म्हणजे निलंबित कर्मचारी जो आहे त्याला जर आपण सर्व्हिसला घेतले तर तो अपराधातुन सुटला असा अर्थ होत नाही. त्याचा कोर्टात अपराध चालूच आहे. जर त्याला शिक्षा लागली. तर त्यानुसार त्याला पुन्हा त्या शिक्षेवर जावे लागेल. म्हणुन या ठिकाणी आपण कुठल्याही कायदयाच्या अडचणीत न येता हे निलंबन दोन्ही प्रस्ताव जे आहेत चार्जशीट दाखल करण्यांचे आणि जर ॲडीशनल चौकशीसाठी त्यांनी जर वेळ वाढवून मागितली असेल तर त्यांना मागता येत नाही. पण जर मागीतले असेल तर आपण न चुकता तो त्यांना दयायचा आणि नसेल मागितला तर निलंबन रद्द करुन त्यांना पूर्ण सेवेत कामावर घ्यावे लागेल असा मी ठराव मांडतो.

**मिलन म्हात्रे :-**

या प्रकरणी जो सहीचा वाद उत्पन्न झाला. आपल्याकडे जे आय.ए.एस. ऑफिसर रजेवर गेले आणि नव्याने खामतकर साहेब आले. यामध्ये स्टेट गव्हर्नमेंटने ऑफिशिअल गॅझेट डिक्लेअर केलेले असेल आणि ते प्रसिद्ध केले असेल. तर त्याची कॉपी मेहेरबानी करुन आमच्या सर्व सदस्यांना दयावी.

नगरपालिकेच्या नोटिस बोर्डवर लावावी. पण हा वाद दोन मिटिंगमध्ये झाला. मागच्या मिटिंगमध्येसुद्धा झाला आणि ह्या मिटींगमध्येसुद्धा झाला. तर ते गॅझेट जर असेल, प्रसिद्ध केले असेल तर ते आम्हांस द्यावे आणि ते प्रसिद्ध झाले असेल मग ही सही या तारखेला झाली कशी? हा वाद उपस्थित होत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम या विषयावर अतिशय विस्तृतपणे चर्चा करण्यांत आलेली आहे. आणि कायदेशीररित्या सगळ्या बाबी तपासाव्यात असा गटनेत्यांच्या सभेमध्ये आमची अशी मागणी होती की आपण याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन पुन्हा विषय हा आणायला पाहिजे होता. कारण आतापर्यंत जे प्रभारी आयुक्त म्हणून त्यांची नेमणुक झाली दुसरी सभा आहे. त्यांच्या कारकिर्दीतील या सभेला तरी निदान त्यांनी हजर राहायला पाहिजे होते. आणि या महापालिकेचे आयुक्त आर.डी.शिंदे साहेब हे प्रशिक्षणासाठी बाहेर गेले. त्यावेळी असे कुठले कुठले जिकरीचे विषय तयार करुन ठेवले ते एकदा तुम्ही तपासून पहावे. जेणेकरुन, सभागृहात सर्व लोकप्रतिनिधी अडचणीत येणार नाहीत. लोकप्रतिनिधीचा वेळ वाया जातो अशातील बाब नाही. या शहरामध्ये या महापालिकेमार्फत ज्या सोयी सवलती दयायच्या आहेत. ही स्वायत्ता, स्वराज्य संस्था आहे. आणि या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत या शहरामध्ये आपल्याला सर्व इथे राहणाऱ्या जनतेला ज्या सोयी-सुविधा, नागरी सुविधा दयायच्या आहेत. आणि त्यांचे प्रतिनिधित्व करण्यांसाठी नगरसेवक हे निवडुन दिले जातात. पण त्यांचा वेळ जात नाही. ही अडचणीची बाब आहे. नगरसेवकांनी या बाबीसाठी वेळ दिलाच पाहिजे. परंतु, या महापालिकेत प्रभारी हा शब्द जरा जास्तच आलेला आहे आणि त्याचे अपचन व्हायला लागले आहे. आपण पाहिले पाण्यावर प्रभारी अधिकारी, आरोग्यावर प्रभारी अधिकारी, शिक्षणावर प्रभारी अधिकारी आणि आयुक्त पण प्रभारी. या गोष्टींना कुठेतरी आपण पायबंद घातला पाहिजे. म्हणून त्याच्यावर रितसर नियुक्त्या करण्यांचा प्रस्ताव पुढच्या सभेसमोर तुम्ही आणावा आणि शासनाकडुन यासाठी अशी तज्ञ मंडळी मागवली तर असा घोळ होणार नाही. आज भरत सोनारे यांच्याबद्दल गुन्हा दाखल झाल्यानंतर सगळीकडे सर्वसाधारण असा प्रघात आहे की सहा महिन्यापर्यंतच्या कालावधीत आपण त्यांच्यावर काही कारवाई केली नाही किंवा त्यांनी तशी मागणी केली नसेल तर सहा महिन्यांच्या नंतर आपण त्यांना कामावर पुन्हा घेतले पाहिजे. या कालावधीमध्ये आपण त्यांना कुठले काम देणार? त्यांचे डिमोशन करणार, वेतन वाढ रोखणार. परंतु, जेव्हा या गुन्ह्याचा कोर्टाकडुन जेव्हा निर्णय लागेल त्यानंतर त्यांना शिक्षा ठोठावली. तर नक्कीच त्यांचे पुन्हा निलंबन येते. म्हणजे त्यांना बडतर्फच करावे लागेल. म्हणुन आपण पुन्हा याबाबत अधिकाऱ्यांच्या माध्यमातुन आणि कायदेशीर सल्लागाराच्या माध्यमातुन या विषयावर व्यवस्थितरित्या माहिती मागुन घ्यावी. मात्र आपल्याला ज्यांच्याकडे गुन्हा दाखल झाला आहे ॲन्टी करप्शन ब्युरोकडे. आणि या कलमामध्ये अशीही नोंद आहे की तो प्रतिनियुक्तीवर आलेला अधिकारी आहे म्हणजे शिक्षण अधिकाऱ्यांवर देखील फक्त परिवहनाचा अधिकारी सोडुन बाकी लोकांवरदेखील या सभागृहात कारवाई करु शकला असता. मला पूर्ण आठवत आहे की हा गुन्हा दाखल झाल्यानंतर या महापालिकेची बदनामी झाली होती. आणि त्यावेळी सभागृहात आयुक्तांना प्रश्न विचारण्यांत आला होता. की शिक्षण अधिकाऱ्यांवर असा गुन्हा दाखल झालेला आहे. तर आयुक्तांनी काय उत्तर दिले की, याबाबतीत मला विशेष माहिती नाही. तर सभागृहाची दिशाभुल करण्यांचे काम त्याने पूर्णपणे केले होते. म्हणुन पुन्हा सांगतो की असे कुठले ठराव त्यांनी अजुन तयार करुन ठेवले आहेत जे त्यांच्या अनुपस्थितीमध्ये सभागृहात आणायचे आहेत. या विषयी आपण माहिती घेतली पाहिजे. आणि आयुक्तांनी जाणीवपूर्वक असे करायचे ठरविले असेल तर ते अतिशय चुकीचे आहे. ते या सभागृहात नाहीत. मग हा विषय घ्यायला नको होता. जेव्हा आधीच हा विषय ते असताना घेतला असता तर त्याच्यावर निर्णय झाला असता. आज आपण भरत सोनारेला पकडल्यापासुन आज सुर्यवंशी साहेब दुसरीकडे अधिकारी पदावर आहेत. कदाचित आज ज्या पदावर आपल्याकडे होते त्याच्यापेक्षा मोठ्या हुद्दयावर असतील. आणि आपला हा स्थायी कर्मचारी यांचा काय संबंध. आजही शिक्षण अधिकारी कुठे असतील तर त्यांनी जरा उभे रहावे. शिक्षण अधिकारी आजही नाहीत. तर असा प्रकार असेल तर प्रभारी भारी पडतात. आपल्याला म्हणुन प्रभारी हे नको आहेत. याबाबत आपण काहीतरी निश्चित धोरण आखावे आणि या विषयामध्ये महापौरांनी तज्ज्ञांकडुन योग्य सल्ला घ्यावा. मात्र सहा महिन्याचा कालावधी जर पूर्ण झाला असेल तर आपण त्याला काहीही करु शकणार नाही असे मला वाटते.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, चर्चा बरीचशी रंगलेली आहे. मघाशी सचिवांनी सांगितले की, या विषयाचा अहवाल येण्यासाठी मला उशीर लागला. उशीराने अहवाल आला म्हणुन सभागृहापुढे आज विषय ठेवलेला आहे. खरे म्हणजे याच्यामध्ये आपली चूक आहे. विषय अतिशय गंभीर आहे. ५६ (ब) प्रमाणे सहा महिन्यापेक्षा जास्त मुदत झाली तर काय होईल. ही चर्चा या ठिकाणी रंगलेली आहे. त्याच्यामुळे खास सभा या विषयावर आपण ठेवू शकला असता. तीन दिवसाची नोटीस देऊन आपल्याला खास सभा या विषयापुरती ठेवता आली असती परंतु मला अहवाल उशीरा आला म्हणुन हा विषय मी उशीरा आणला. त्यामुळे ज्या कायदेशीर चुका झालेल्या आहेत आणि जे काही आता होत आहे त्याला जबाबदार हे सभागृह नाही. या विषयावर कुठलातरी निर्णय हवा. कारण निलंबन वाढविण्यासाठी हा विषय आणलेला आहे. चार्टशीट देण्यासाठी किंवा इतर विषयासाठी हा विषय आणलेला नाही. निलंबन फक्त वाढवावे. या विषयासाठी आपण सभेमध्ये मागणी केलेली आहे. निलंबन वाढविण्याचा प्रश्न ५६ (ब) प्रमाणे नाहीच आहे. ५६ (ब) प्रमाणे तो विषय संपलेला आहे. सहा महिन्याचा कालावधी जास्त झालेला आहे. तेव्हा पीठासन अधिकारी या विषयावर निर्णय देतील. या सभागृहापूढे हा विषय संपलेला आहे. असे मला वाटते. आपण काय योग्य तो निर्णय घ्या.

**दिनेश नलावडे :-**

या विषयावर बरीच साधक बाधक चर्चा झाली आहे. निलंबन आदेशांत तांत्रिक चुक झालेली आहे. त्यामुळे सदर बाब प्रशासकीय तत्सम कारणाने निलंबन कायम करावे किंवा नाही याबबतचा निर्णय मा. आयुक्त यांनी घेणेबाबत मी ठराव मांडीत आहे.

**मा. महापौर :-**

मला वाटते हा निर्णय कमिशनर साहेबांनीच घेतला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी ज्या विषयी बोलत आहे तो ह्या विषयाशी संबंधित नाही. ह्या विषयाला अनुसरुन किती चुकीच्या पद्धतीने हा विषय या ठिकाणी आणला गेलेला आहे हे सगळ्या सभागृहाने आता पाहिले. नवघर मैदानाच्या बाबतीत म्हणजे गेल्या वर्षी स्थायी समितीने निर्णय घेतला होता की, सांस्कृतिक आणि शैक्षणिक बाबी वगळुन त्या मैदानाला परवानगी देण्यांत यावी. तरी सुद्धा गेल्या दोन महिन्यामध्ये कितीतरी बाजारु पद्धतीच्या कार्यक्रमाला अनुमती दिली गेली. ऑर्केस्ट्रा झाले. त्या ठरावामध्ये स्पष्ट म्हटले होते आणि किती दिवसासाठी परवानग्या दयाव्या हे सुद्धा नमूद केले होते. ते क्रिडांगण मुलांच्या आणि इतर लोकांच्या खेळासाठी आहे. क्रिडा व्यवस्थेसाठी असतानासुद्धा आपण व्यापारीकरणाला तिथे परवानगी देत असतो. ठराव एकीकडे राहतात. हरीभाऊ म्हणतात बांधकामाला दिला. बांधकाम म्हणते आम्ही केळकरांकडे सुपुर्द केलेला आहे. ठराव कोणी वाचत नाही आणि परवानग्या दिल्या जातात. स्थायी समितीला वेळोवेळी आम्ही रिफर करायचे आणि स्थायी समितीने एकच विषय घेऊन प्रत्येक वेळी निर्णय घ्यायचे. मला असे वाटते, मघाशी आमचे सदस्य आसिफ शेख बोलले तर याबाबतीत अधिकाऱ्यांनी ठराव आणि त्यांच्या सगळ्या पायऱ्या सांभाळुन चालावे. दोन लोकांमध्ये, सदस्यांमध्ये, नगरसेवकांमध्ये आणि बाहेरच्या व्यापाऱ्यांमध्ये किंवा बाहेरच्या सामाजिक संस्थांमध्ये कारण माझी बातमी तशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली की सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांचा विरोध. मला त्या मैदानामध्ये घर बांधायचे नाही. परंतु, मी जो विरोध केला. तो कोणासाठी आणि का केला? हे त्या पत्रामध्ये नमूद केले होते. त्याकरीता मी पून्हा एकदा विनंती करते की अशा भानगडी लावण्याचे काम अधिकाऱ्याकडून केले जात असेल तर ती बाब अतिशय वाईट आहे असे माझे मत आहे. जे आतासुद्धा सभागृहात दिसले यावर कृपया आपण एकदा अध्यक्ष म्हणून सगळ्या अधिकाऱ्यांचे मनोगत चांगले उंचवावे अशी मी आपल्याला विनंती करते.

**प्रकरण क्र. ४५ :-**

निलंबित लिपीक कर्मचारी श्री. भरत सोनारे यांचे निलंबन कायम करणेबाबत.

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक कर्मचारी श्री.भरत सोनारे यास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने लाच घेताना पकडुन मिरा रोड पोलिस स्टेशन येथे दि. १०/४/०३ रोजी गुन्हा दाखल केल्याने आदेश क्र.मिभा/ मनपा/ आस्था/२३७/१८९१/०३-०४,दि.११/६/०३ ने निलंबित केले होते. व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (ब) अन्वये निलंबन सहा महिन्याचे आत कायम करणेसाठी सभागृहापुढे सादर करण्यांत आले आहे.

सभागृहात मा.नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर प्रशासनाकडून अनेक मुद्यावर सविस्तर खुलासा करणेत आला. निलंबन आदेश तारीख ११/६/२००३ असल्याने सहा महिन्यापेक्षा जादा कालावधी

झालेला नाही. परंतु दि.११/६/२००३ चे आदेशात निलंबन दि.१०/४/२००३ (म.नं.) पासून असा उल्लेख चुकीने आल्याने या सभागृहात अनेक कायदेशीर व तांत्रिक मुद्दे उपस्थित केले. ही बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे याबाबत मा. आयुक्त यांनी योग्य तो निर्णय घेणेस अधिकार देणेत येत आहेत. असा ठराव मी मांडीत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सभागृहात अतिशय गरमागरम चर्चा होत आहे. आणि अगदी दिवाळीच्या तोंडावर थोडासा कटु विषय नको. मी सभागृहाला विनंती करतो की हा विषय पुढच्या सभेमध्ये निर्णयासाठी ठेवावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आता सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती आणि सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी आताच जो विषय मांडलेला आहे. आपल्या जो सभागृहासमोर आलेला आहे. सकाळपासुन या सभागृहामध्ये अतिशय गंभीरतेने विषय चालू आहे. आणि सात दिवसामध्ये आपल्या भारत देशामध्ये दिवाळीचा सण मोठ्या उत्साहामध्ये साजरा होत असतो. हा जो विषय आता आपल्यासमोर आलेला आहे. हा अतिशय नाजूक विषय आहे. आणि ह्या विषयाला धरुन आपण हा विषय सभागृहामध्ये मांडला तर दिवाळी ह्या शहरवासियांची चांगली जाणार नाही आणि म्हणून जो विषय समोर आलेला आहे. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी हा विषय पुढे ढकलण्यासाठी या सभागृहाला सूचना केलेली आहे. त्या मताशी मी सहमत आहे. आणि हा विषय पूढे ढकलण्यासाठी सर्व सभागृहाने निर्णय घ्यावा अशी मी सभागृहास विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम या विषयावरती म्हणजेच नामकरणाच्या विषयावर नाही. गेल्या अनेक सभांमध्ये हा विषय पुढच्या सभेत घेऊ या. असे अनेक विषय झाले. ते एकदा या पटलावरुन गेले की परत काही येत नाहीत. त्याकरिता मी तुम्हाला पत्र दिलेले आहे. मॅडम, बघा यापेक्षाही गंभीर प्रश्न या अगोदरच्या आपल्या विषयपत्रिकेवरचे पटलावरचे प्रश्न घेण्यात आले नाहीत. त्याकरीता विषय प्रकरण क्रमांकावर तुम्हाला मी पत्र दिलेले आहे. काय होते कीप ॲज मॅटर केल्यानंतर लागणाऱ्या सभेत तुम्ही तो विषय घेतला पाहिजे. असे अनेक विषय प्रशासनातर्फे मागे पडले जातात. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा जो घन कचरा व्यवस्थापनाचा जो विषय आहे. काय निर्णय घ्यायचा तो तुम्ही घ्या. पण एकदा पटलावर आणून डिसेंबरच्या आतमध्ये त्याचे काहीतरी सदोगती लावा. कारण डिसेंबरपर्यंत आम्हाला तसे बंधन आहे आणि काय तुम्हाला निर्णय हो नाही आणि मतदान जे कोणाला करायचे नाही ते निगेटिव्ह मतदान करतील. आम्हाला करायचे तर पॉझीटिव्ह करु पण पटलावर आलेला विषय तीन सभा झाल्यातरी तो घेतला गेलेला नाही. हे जे आता परत पुढच्या सभेत घ्या. असे किती विषय आहेत? ते सर्व एकत्र घ्या. आणि त्यावर काहीतरी एक निर्णय घ्या.

**मा. महापौर :-**

निर्णय घेऊ.

**प्र. सचिव :-**

मा. महापौर मॅडम यांच्याकडुन एक सुचना पत्र आलेले आहे. ते त्यांच्यावतीने मी वाचन करतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे गटनेते म्हणून हॅरल बोर्जिस यांनी चांगली कामगिरी बजावली त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच यापुढे पक्षाचे गटनेते म्हणून श्री. रविंद्र माळी यांची गटनेते म्हणून नियुक्ती करण्यांत येत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आदरणीय महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे सन्मा. महापौर मॅडम सत्ताधारी पक्षाचे गटनेता म्हणून गेले वर्षभर आपण मला काम करण्याची संधी दिली. माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवकांनी सन्मा. सदस्यांनी चांगले सहकार्य केलेले होते. त्याचप्रमाणे, माझ्या सोबत इतर सर्व पक्षीय गटनेते भाजपा, शिवसेना, शहरविकास आघाडी, जनता दल, काँग्रेस (आय), या सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी जे सहकार्य केले. त्याबद्दल सगळ्या गटनेत्यांचे मी मनपूर्वक आभार मानतो आणि नवीन गटनेते म्हणून रविंद्र माळी यांची जी आपण निवड केलेली आहे. तर रविंद्र माळी यांना मी माझ्यावतीने आणि सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो. आणि त्याचा पुढील कार्यकाल यशस्वी जावा अशी मी प्रार्थना करतो.

**मोहन पाटील :-**

गटनेते रविंद्र माळी यांची महापौर मॅडमनी या ठिकाणी घोषणा केलेली आहे. राष्ट्रवादीचे आमचे गटनेते हॅरल बोर्जिस आहेत. त्यांनी संपूर्ण सर्व सदस्यांना एकत्र घेऊन ज्या पद्धतीने चांगली कामगिरी बजावली त्याबद्दल त्यांना मी पार्टीच्या वतीने धन्यवाद देतो. आणि नवनिर्वाचित सदस्य गटनेते रविंद्र माळी यांचे या ठिकाणी स्वागत करतो. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम या सभागृहात आमची जी आसन व्यवस्था आहे तर या ठिकाणी ए.सी. आणि पंखादेखील नाही. बाहेरच्या लोकांच्या दालनातदेखील नाही. तीन सभा झाल्या.

**मोहन पाटील :-**

सर्व गटनेत्यांना आपण या ठिकाणी दालने दिली होती. आणि ती दालने उपलब्ध केल्याबद्दल मी महापौर मॅडमना धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे आता सभा संपल्यानंतर सर्व सदस्यांना नम्र विनंती की राष्ट्रवादी काँग्रेस गटनेत्यांच्या दालनाचे संध्याकाळी उद्घाटन सभेनंतर होणार आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित राहून आम्हाला सहकार्य करावे ही विनंती.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम आता आपल्या पक्षातर्फे दोन नियुक्त्या केल्या गेल्या आणि वरचेवर सभागृहामध्ये असे कितेक जणांचे कौतुक किंवा स्वागत करण्यांत येते. आपण दोन्ही वेळा आपले पत्रकारांचा कॅमेरा वापरला. सभागृहाला आणि आपल्याला विनंती आहे की आपल्या नगरपरिषदेची इतकी सक्षम बाजू असताना एक कॅमेरा घ्यायला हरकत नाही. आपल्या स्वतःचा एक कॅमेरा आणून ठेवावा म्हणजे आपल्या संग्रही येईल. त्याचा वापर असेल तर करावा. आपली याच्यापुढे स्वतःची यंत्रणा असावी की, ती क्षणचित्रे आपल्याकडे कायमची राहतील.

**रविंद्र माळी :-**

मॅडम मला गटनेता प्रमुख म्हणून निवडुन दिल्याबद्दल महापौर मॅडमचे मी आभार मानतो. आणि सर्व सदस्यांचे मी आभार मानतो.

**प्र. सचिव :-**

आता पूरक घोषणा आहे. १७/१०/०३ सभेकरिता पूरक घोषणा आलेली आहे. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका.

**रोहीदास पाटील :-**

हा विषय अजुन चालुच आहे. संपला नाही. नामकरणाच्या विषयावर तुम्ही काय रुलिंग दिले. काय ठराव मांडला? तुम्ही काय रुलिंग दिले? यांनी मांडला. आम्हाला काही बोलायचा अधिकार आहे की नाही? प्रशासनाने उपोषण करताना उत्तर दिले होते की हा विषय महासभेपुढे घेण्यात येईल. त्याप्रमाणे महासभेने विषय घेतलेला आहे. त्यांनी उपोषण सोडलेले आहे. एखाद्याने ठराव मांडला म्हणजे तो झाला असे कसे होईल? शहरातील कोणत्या वातावरणाची तुम्हाला भीती वाटते? ज्यावेळी त्या जैन समाजाचे अकरा सन्मा. सदस्य पाच दिवस उपोषणाला बसले. तेव्हा यातील किती नगरसेवक त्यांना सद्भावनेने, धार्मिक भावनेने भेटायला गेले होते. महापौर मॅडम एकदा सोडुन दोन वेळा गेल्या. आम्ही त्यांचा आदर करतो. समाजदेखील आदर करिल. अन्य सदस्यांनी एक सन्मानित सदस्य या सभागृहातील तीन सदस्य कैलासबेन त्यावेळी आजारी पडल्या याची दखल कोणी घेतली? जे जसे प्रशासकीय कामकाज चालले आहे. तसेच, आपण सन्मा. सदस्यांनी चालवायचे का? प्रशासनाने हा ठराव आणलेला आहे. सन्मा. सदस्यांनी त्यांच्यावर निर्णय घ्यायचा आहे. ही वस्तुस्थिती सभागृहाच्या

समोर आली पाहिजे. या दृष्टीने बोला. सभाच तहकुब केली तर विषय वेगळा आहे. सभेचा ठराव जर तुम्ही करत असाल तर त्याची पार्श्वभुमी काय आहे?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा सभागृहाच्या कामकाजाच्या संबंधित या बाबी आहेत. की परिपूर्णरित्या माहिती आली नाही. घाईगर्दीमध्ये एखादा गोषवारा सादर केला गेला प्रिपरेशन होत नाही आणि मग आपणाला प्रत्येक वेळी आजचे मरण उद्यावर, उद्याचे परवावर आपण चालवत आहे. सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे यांनी जे सांगितले की बरेचशे माझे प्रस्ताव बायपास झालेले आहेत. आम्हाला त्याची जाणीव आहे. सत्तारूढ पक्ष म्हणून आणि या सभागृहाचा नेता म्हणून मीसुद्धा या प्रश्नामध्ये गांभीर्याने बघु इच्छितो आणि असे प्रस्ताव जे काही बायपास झाले असतील. पण ज्या प्रस्तावना सार्वजनिक महत्त्व आहे. नगरपालिकेच्या विकासाशी आणि त्याच्या उत्कर्षाशी ज्या प्रस्तावांचा संबंध आहे असे सगळे प्रस्ताव या सभागृहापूढे परिपुर्णरित्या आणण्यासाठी आपल्याला विचार करावा लागेल. सन्मा. नगरसेवक आणि या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य रोहिदास पाटील यांनी नामांतराच्या प्रश्नाबद्दल आपली भूमिका विशद करताना अगोदर एक ठराव पास झाला. पास झाला ठिक आहे. आपले हे अद्यापीसुद्धा आपण खेळीमेळीच्या वातावरणामध्ये सभागृह चालवत आहोत. आपण जे मांडले तेही अंर्तमुख करणारे आहे की, जेव्हा दोन-चार सदस्य उपोषणासाठी बसले होते. त्यावेळी किती लोकांनी त्यांच्याबद्दल आदर दाखविला. मला आठवत आहे. आमच्या सन्मा. महापौर मॅडम तीन वेळा त्या उपोषणकर्त्या मंडळींना भेटल्या. त्यानंतर आम्ही ज्यांना नेते मानतो ते गिल्बर्ट मेंडोसा स्वतः दोन वेळा आपल्या मंडळींना भेटले आणि त्या ठिकाणी महापौरांनी त्यांना एकदा विनंती केल्यानंतर उपोषण सोडावे पण त्यांचा आदर करण्यांत आला तो भावनेचा प्रश्न असेल. आज सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती यांनीसुद्धा आज ठरावाची भूमिका मांडली की, येणारी दृष्टीपथातील दिवाळी आनंदाची दिवाळी लक्षात घेऊन कुठेही शहरामध्ये कटुतेचे वातावरण होऊ नये म्हणून हा प्रस्ताव आपण थोडा वेळ स्थगित ठेवत आहोत. मला वाटते मी काल नव्हतो तेव्हा याच्यावर गटनेत्यांमध्ये एकवाक्यता झाली होती. तर तशी जर झाली असेल तर मी सन्मा. रोहिदास पाटील यांना जरुर विनंती करीन, की आपण हा ठराव आजच्या आजच विचारात घ्यायचा असेल तर त्याच्यामधुन निरनिराळे आरोप, प्रत्यारोप होण्याची शक्यता असते व ती कटूता टाळता यावी म्हणून आपण हा प्रस्ताव सर्वानुमते पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**रोहीदास पाटील :-**

महापौरांना विनंती करतो की, सभागृह नेते अनुभवी आहेत. त्यांना बरोबर शब्द कुठे फिरवायचा याचा अनेक वर्षाचा त्यांना अनुभव आहे. ते काल गटनेत्यांच्या बैठकीला नव्हते. आता अचानक सभागृह नेते झाले. त्यामुळे त्यांच्यावर नैतिक जबाबदारी झाली. आणि सभागृहाचे कामकाज अत्यंत शांततेने, शिस्तीने कमी वेळात जास्तीत जास्त काम पार पाडायचा त्यांचा प्रयत्न राहील आणि त्यांच्या बऱ्याचशा कारकीर्दीमध्ये जेव्हा जेव्हा ते सभापती होते. तेव्हा त्यांनी थोड्या वेळात बरीच कामे पार पाडली याचा आम्हाला अनुभव आहे पण जेव्हा आत-बाहेर राहतात तेव्हा थोडीशी अडचण होते. काल ते बाहेर होते. आज आत आहेत त्यामुळे एकतर नक्की आहे की कालच्या गटनेत्यांच्या बैठकीत मी फक्त त्या परिस्थितीचे निवेदन केले होते. त्याच्यावर पूढे घ्या मागे घ्या असा निर्णय झाला नव्हता. आतही सभागृहाला तो निर्णय मागे घ्यायचा असेल तर या गावाला आगी लावणारे आम्ही नाही. हे नक्की आहे. त्यामुळे कोणी चिंता करायचे कारण नाही. एकदा रुलिंग दयायचे आहे सभा संपलेली आहे. तर रुलिंग दया तो विषय वेगळा आहे पण जोपर्यंत बोलतो तोपर्यंत शांत चित्ताने ऐकायचा तर प्रयत्न कराल की नाही कारण सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी नुकतेच सांगितले की त्यातील सखोल अभ्यास करायचा आहे. हा विषय सुरु झाल्याला एक दिवसाचा विषय नाही. एकाएकी आयुक्तांनी पुढे आणला अशातील विषय नाही. हा विषय सुरु झाल्याला तब्बल दोन महिने होऊन गेले. दोन महिने सोळा दिवस या गोष्टीला झाले. आणि दोन महिने सोळा दिवस झाल्यानंतर त्यांना अभ्यास करायचा असेल तर अभ्यास करु दया. पण एक वस्तुस्थिती आहे की मी एवढे निवेदन करु इच्छितो. नंतर महापोरांनी जो योग्य वाटेल तो निर्णय दयायचा. जे तुम्हाला मान्य आहे ते आम्हाला मान्य आहे. कारण जे सभागृहात होणार आहे ते आमच्या मतावर होणार नाही. याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. त्यामुळे आमची विनंती राहिल. पोटतिडकीची विनंती राहिल की या शहराची शान या शहरातील सर्व धर्माच्या भावना, या शहरातील सर्व व्यक्तीचा मान, या शहरातील सर्व अधिकाऱ्यांचा सन्मान या सभागृहाचे पावित्र्य मग ते

पंचायत असु दे किंवा नगरपरिषद असू दे, किंवा महापालिका असु दे, मी या सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की या शहरामध्ये बावन्न जिनालय बनल्यानंतर या शहराचे नांव वाढले हे महाराष्ट्रातले एकमेव बावन्न जिनालय बनले. त्यामुळे बावन्न जिनालयमुळे शहराचे नांव वाढले. त्याचे महत्त्व वाढले. महिमा वाढला. त्यावेळचे सरपंच श्री. गिल्बर्टजी मेडोन्सा यांच्या एक सदविवेक बुद्धीने या शहराचे नांव वाढते या दृष्टीकोनातुन तत्कालीन ग्रामपंचायत सदस्य वंदना गोखले, गंगाधर गाडोरिया यांनी ठराव मांडुन ग्रामपंचायतीचा एकमताचा ठराव होऊन ते १९८१ साली ते नांव जैन मंदिर पथ म्हणून झाले. लोक त्याचे स्वागत करायला लागले. लोकांनी वापरात घेतले. सगळ्या दुकानदारांनी वापरात घेतले. आपले सन्मा. सदस्य मिलन पाटील त्यांनीही वापरात घेतले. जैन मंदिरमार्ग म्हणुन बोर्ड लिहिले. असे असताना मधल्या काळामध्ये आताही जी टिपणी दिलेली आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी कोणतेही नशापान न करता अक्कलहुशारीने ही टिपणी दिलेली आहे. त्यामध्ये लिहिलेले आहे की, सार्वजनिक बांधकाम समितीचा व स्थायी समितीचा ठराव तो ग्रामपंचायतीचा झालेला ठराव बांधकाम समितीमध्ये येते वेळी बांधकाम समितीच्या ठरावामध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख नाही आहे. बांधकाम समितीच्या ठरावामध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. की देवचंद नगर मार्ग मी सभागृहाच्या निर्देशनास आणतो. मा. स्थायी समितीची ज्यावेळी सभा झाली. त्या मा. स्थायी समिती सभेमध्ये बांधकाम समितीने दिलेली नांवे, आणि मा. स्थायी समितीने कोणत्या अधिकारात घुसवलेली नांवे याचे कुठेही इतिवृत्तांत नाही आहे. हे सर्व महापालिकेने लेखी दिलेले आहे की त्या बांधकाम समितीच्या कामकाजाची इतिवृत्तांतात नोंद नाही हे पटलावर लिहुन घ्या तुम्ही हे झाले मा. स्थायी समितीच्या कामकाजानंतर याचे लगेच नामकरण झाले नाही. स्थायी समितीच्या कामकाजानंतर जेव्हा नगरपालिकेची महापालिका झाली. तत्कालीन व प्रभारी आयुक्त शिवमुर्ती नाईक हे होते. तत्कालीन आणि आताचे पी.आय. निंबाळकर साहेब होते. ज्यावेळी संबंधित लोकांनी तिथे देवचंद जेठालाल संघवी असे नांव लावले. लोकांमध्ये प्रक्षोप झाला. लोकांमध्ये प्रक्षोप झाल्यानंतर या सक्षम अधिकाऱ्यांनी त्यावेळी असा निर्णय घेतला की, संस्थेच्या वतीने लावलेले नांव हा बोर्ड त्यांनी काढून घेतला आणि तो विषय पेन्डींग राहिला. आता परत प्रशासनाच्यावतीने त्याचवेळी ही यादी काय असावी आणि काय आहे. याची सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोरिया यांनी १८/१२/०१ रोजी म्हणजे नगरपरिषदेच्यावेळी पत्र देऊन तेव्हा ती स्थायी समितीची यादी काय आहे? याची कोणती मंजुरी दिली. ती यादी आजपर्यंत दिली नाही. त्याचवेळी तो विषय जेव्हा महासभेसमोर आला. महासभेत त्याचा नीट उलगडा होत नव्हता. मी स्वतः सांगितले होते. माझे त्या महासभेच्या प्रोसिडिंगमध्ये निवेदन आहे की, या विषयाचा उलगडा नीट हात नाही. अपुऱ्या माहितीचा विषय तुम्ही पुढच्या सभेत घ्या. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मागेसुद्धा सांगितले होते की, या कामाला यासाठी संशय येतो की जी नावे आम्हाला माहित नाही. ती नावे घेतली, घुसवीली असतील असे वाटते. म्हणुन ती यादी मी मागतो आहे. त्यावेळीचे नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांचे त्यावेळीचे निवेदन आहे.

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर मॅडम यह क्या चला हुआ है। जब विषय नही लेना है तो मुझे इस विषय पे बोलने का है। यह बराबर नही है।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमजी याच्यावरती पहिल्यांदा सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैतीजी ठराव मांडला आणि अनुमोदन येथून दिले. आणि हा विषय पूढे घेण्यांत यावा आणि शहरामध्ये बराचसा आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी चांगले मत मांडले आणि त्याच्याकडे अजुनही माहिती नाही आहे. स्थायी समितीने कुठले ठराव मांडले? आणि सभागृहात काय झाले? मागच्या वेळी नावांचे कोणते ठराव झाले? याबाबत प्रशासनाने अजून माहिती दिली नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. आणि त्यांच्या वक्तव्याला तुम्ही किंमत दयायला पाहिजे. आणि आपण गांभीर्यपूर्वक विषय या ठिकाणी मांडत बसतो आणि अशी माहिती त्यांच्याकडे नसेल तर माहिती नसताना बोलणे चुकीचे आहे. त्यांना त्यांची पूर्ण माहिती दिली पाहिजे. आणि एकच गंभीर बाब आहे की, कोणत्याही पत्राला तुम्ही उत्तर दयायचे नाही. आणि उत्तर न दिल्याने असे विषय आपल्याकडे येतात. म्हणून मी प्रशासनाला विनंती करतो की आपण लवकरात लवकर त्यांना हे उत्तर दयावे. आणि त्याची संपूर्ण माहिती स्थायी समितीमध्ये कोणते ठराव झाले? बांधकाम समितीपुढे कोणते ठराव झाले? नावाबाबत एक संपूर्ण यादी व माहिती मला दयावी आणि या शहरामध्ये चांगली पद्धत दिली पाहिजे. दिवाळीचा सण आलेला आहे. लोकांच्या भावना दुखवु नयेत

यासाठी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी चांगला ठराव मांडलेला आहे. त्याला अनुमोदन दिलेले आहे. हा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा अशी मी विनंती करित आहे. संपूर्ण माहिती आपण दिली पाहिजे. ती योग्य माहिती आणल्यानंतर त्यांना बोलता येईल. असे मी या ठिकाणी नमुद करित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टिपणी दिलेली आहे. स्थायी समितीचा ठराव दिलेला आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**कैलासबेन जानी :-**

एवढी माहिती दिल्यानंतरसुद्धा तुम्हांस कोणती माहिती पाहिजे ती मी देण्यांस तयार आहे.

**दिनेश नलावडे :-**

सदरचा विषय पूढच्या सभेत घ्यावा. मा. महापौर याबाबत रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

आपण हा विषय पुढच्या सभेत घेऊ.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी ते भांडण लावण्याचे काम केलेले आहे. तर असे भांडण लावण्याचे काम करु नये अशी माझी त्यांना विनंती आहे. आता दिवाळीचा सण आहे. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतींनी जे वक्तव्य केले ते बरोबर आहे कारण माझ्या प्रभागामध्ये की जे देवचंद नगर जैन मंदिर रोड परंतु काही लोक देवचंद नगर रोड सुद्धा लिहितात. काही लोक जैन मंदिर रोडसुद्धा लिहितात. काही एक नक्की नाही. इतर लोकांचे कार्डवर ॲड्रेस पाहिले त्यावर आहे. जेव्हा प्रशासनाने नक्की केले तेव्हा हे प्रशासनाच्या बाजुने झालेले आहे. मी माझे नाव बदली केलेले आहे. आणि देवचंद जेठालाल संघवी मार्ग हे मी नामकरण करुन माझ्या बोर्डावरील नाव बदली केलेले आहे. जेव्हा प्रशासनाने नक्की केले तेव्हा मी प्रशासनाच्या बाजूने झालेलो आहे. बोर्डावरील मी प्रशासनाच्या बाजुने आहे. याच्यापुढे कोणतेही प्रशासन निर्णय घेईल. त्या बाजुने मी राहणार आहे.

**कैलासबेन जानी :-**

बी.एस.ई.एस. चे बील बदली कोण करणार. बी.एस.ई.एस.चे जैन मंदिरमार्ग आहे ते बदली करायला कोण जाणार?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव मताला टाकावा. आम्ही ठराव या ठिकाणी मांडलेला आहे तर चर्चा पुढे करावी आणि असा जर गोंधळ होत असेल तर चर्चा पुढे घ्यावी. सभागृहाच्या भावना दुखावतील असे काम न करता आपण ठराव मांडलेला आहे.

**महेन्द्रसिंग चौहान :-**

आज शहर की भावना को देखते हुए जिस तरह से गटनेत्याने बनाया की ये मिटिंग में थोडा आगे ले जाये वही सबसे अच्छा रास्ता है। सन्मा. सदस्य रोहीदास पाटीलजीने कहा हम शहरको आग लगाना नही चाहते। मै फिर आपको बिनती करता हूँ। यहा पर बैठे हुए पूर्व नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटीलजीने मुझे लगता नही बीजेपी की एक-एक, दो-दो नाम सबको दिये हुए है। रोहिदासजी को खुद तीन नाम दिये है। सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी को तीन नाम दिये। मै शहर मे शांती रहे दिवाळी का त्योहार अच्छी तरह से जाये इस तरह का रास्ता निकाला था। आपके साथ हम लोग गये थे। इन्होने बाकायदा पेपर में दिया। मा. मायरा मेंन्डोंसा के आश्वासन पर श्री. महावीर अनुयायी संघ समिती सदस्योने अनिश्चित कालीन होकर हम लोगोंने ये मान्य किया चलो कम से कम उनके सामने तो नही उठे लेकिन पीछेसे आपने पेपर मे दिया की मायरा मेंडोसाजी के कहने से आपने आपका आनसन तोडा। क्या आप मानते है या नही। आप लोग एक यहाँ बोलते हो। दुसरी जगह दुसरे बोलते हो। यह आग लगाने जैसा है। इस मुद्देको शांतीसे बैठकर चेंबर मे मा. महापौर मायरा मेंडोन्सा और गिल्बर्ट मेंन्डोंसा से बात करना चाहिए।

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मै बोलना चाहती हुँ। पिछसे नही लेकिन महापौर का मान रखते हुए यह उपवास पीछे लिआ हुआ था। लेकिन आप जैसे बोल रहे है की पिछले लेने जैसी बात न हो थी। यह सबको समझाकर उठनेवाली बात थी। उसी टाईम झगडा होनेवाला था। अगर शिवसेनावाले उठते थे।

इसिलिए हमने जानबुझकर मा. महापौर का आदेश मानकर यह उपोषण पिछे लिया हुआ है। आपका बोलने का तात्पर्य यह है की उनके पिछेसे लेकिन ऐसा कुछ भी नही हुआ है। जो भी हुआ है वह उनका मान रखकर हुआ है।

**मा. महापौर :-**

वो लोग सबका नाम दे रहे है। वह गाववाले उनके ही है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर से निवेदन है की जितके नामकरण किये हुए है सबके सब कॅन्सल किया जाए।

**रक्षा शाह :-**

मा. महापौर की विनंती मानकर यह उपोषण पिछे लिआ हुआ है। महावीर अनुयायी संघ ने बोला था। जैन मंदिर मार्ग नीचे देवचंद नगर लिखो। जैठालाल कौन है यह हम आजतक नही जानते। जेठालाल कहाँ है। देवचंद शेठ देखा था एक बार तेईस साल पहले जेठालाल किधर है।

**(सभागृहात गोंधळ)**

**दिनेश नलावडे :-**

हे कोण हे शब्द बोलले ते चांगले नाही. त्या व्यक्तीने जागा दिलेली आहे.

**महापौर :-**

मी सांगितले ना की हे पुढच्या मिटिंगला घेऊ.

**कैलाशबेन जानी :-**

मा. महापौर यावरती काहीतरी निर्णय घ्या. पुढच्या सभेला येईल तरी आमचा प्रस्ताव म्हणून होऊ द्या.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौर मॅडम मी विनंती करत आहे की मी कुणावरही आरोप करीत नाही आहे. जी वस्तुस्थिती आहे. मला बोलायला परत मिळेल का?

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा क्र. १४ मधील शिक्षिका श्रीमती सीमा अविनाश भोसले यांचे आज दि. १७/१०/२००३ रोजी अपघाती निधन झाल्याने ही सर्वसाधारण सभा शोक व्यक्त करीत आहे.

**सुचक :- श्री. लिओ इजिदोर कोलासो** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा.उपमहापौर, मा.आयुक्त , मा.प्र.सचिव अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**दुपारी २.२० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**